


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




## मराठा कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी प्राप्त अर्ज प्रलंबित राहू नयेत

### जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील : मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्देश

मुंबई : (समर्थ गांवकरी)



मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेटिअरच्या संदर्भात सप्टेंबर २०२५ मध्ये जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानंतर मराठवाडा महसूल विभागातील आठही जिल्ह्यांत प्रमाणपत्रांसाठी अर्ज प्राप्त होत असून, हे अर्ज प्रलंबित राहू नयेत यासाठी कार्यवाहीस गती देण्यात यावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. गावपातळीपर्यंत जाऊन शासकीय यंत्रणेने सक्रियपणे प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण उपसमितीच्या झालेल्या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव गणेश पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, उपसमितीचे सदस्य, विविध विभागांचे सचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, उपसमिती तसेच माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे यांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जात दाखले व वैधता प्रमाणपत्र वितरणातील अडथळे दूर करावेत. मराठा कुणबी जात दाखले व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने स्पष्ट आदेश दिले असून, हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी, जिल्हा प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीचा नियमित आढावा विभागीय आयुक्तांनी घ्यावा,असेही त्यांनी सांगितले.

दाखले वितरणाचा वेग वाढविण्यासाठी माजी न्यायमूर्ती शिंदे यांनी दिलेली महत्त्वपूर्ण माहिती उपयुक्त ठरणार असून, ते मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांना भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत. सप्टेंबर २०२५ नंतर प्राप्त अर्ज व वितरित दाखल्यांचे प्रमाण सध्या कमी असून, ते वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी सूचित केले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले की, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध शैक्षणिक लाभ दिले जात आहेत. शिष्यवृत्ती तसेच शैक्षणिक व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती आदींसाठी ओबीसी विभाग, वैद्यकीय शिक्षण व कृषी विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्यात यावी. या दृष्टीने बैठकीचे आयोजन करावे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मराठा कुणबी उमेदवारांच्या जात प्रमाणपत्र अर्जांवर तातडीने कार्यवाही करताना प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीत सचिव गणेश पाटील तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी जात प्रमाणपत्र वितरणाची सद्यस्थिती सादर केली.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रहिवासी पुरावे, वंशावळ व १९६७ पूर्वीच्या पुराव्यांच्या आधारे करण्यात येत असलेल्या नियमानुसार कार्यवाहीची माहिती दिली.

## थोडक्यात...

### अधिकाऱ्याचा हृदय विकाराने दुर्दैवी अंत

उमरगा (जि. धाराशिव) (समर्थ गांवकरी) : उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षकाचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (ता. 26) सकाळी घडली. मोहन भीम जाधव (वय 56, रा. प्रतापनगर, सोलापूर) असे त्यांचे नाव आहे. येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचा कर्नाटक सीमेलगत तलमोड भागात सीमा तपासणी नाका आहे. मिळालेल्या माहितीनुसार तेथे मोहन जाधव कार्यरत होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त तेथे ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाल्यानंतर त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि ते कोसळले.

### उमेदवाराचे अपहरण

उदगीर (समर्थ गांवकरी) : औसा विधानसभा मतदारसंघातील तांबाळा जिल्हा परिषद गटाच्या अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार अंजना सुनिल चौधरी यांचे अपहरण झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, या घटनेमुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात तसेच राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शनिवारी (ता. 24) रोजी सायंकाळी सुमारे 5 वाजता अंजना चौधरी या बिदर रोड, उदगीर येथे त्यांच्या एका मैत्रिणीच्या घरी हळदीकुंकवाच्या कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. कार्यक्रमानंतर मतदारसंघात प्रचारासाठी जाण्याचे नियोजन होते. त्यांना घेण्यासाठी काँग्रेसचे स्थानिक नेते रणजीत कोकणे (रा. कासार बालकुंदा, ता. निलंगा) हे तेथे गेले होते.

## मॅग्नेट २.० प्रकल्पाद्वारे पणन विषयक गुंतवणूक, कृषिमालाचे मूल्यवर्धन व रोजगारवाढीस गती देणार – पणन मंत्री जयकुमार रावल

मुंबई : (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र शासन आणि आशियाई विकास बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प राज्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक संघटना आणि कृषीमूल्य साखळी मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे सांगून या प्रकल्पाच्या माध्यमातून पणन विषयक गुंतवणूक, कृषिमालाचे मूल्यवर्धन व रोजगार वाढीस गती देणार असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीस आशियाई विकास बँकेच्या संचालक (भारत) श्रीमती मिओ ओका, संचालक ताकेशी उडेओ, क्रिशन रौटेला तसेच पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे यांच्यासह प्रकल्पाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पणन मंत्री जयकुमार रावल यांनी मॅग्नेट प्रकल्पाच्या राज्यातील प्रगतीबाबत आश्वस्त करताना प्रकल्पाच्या अंमलबजावणीद्वारे राज्यात पणनविषयक गुंतवणूक व रोजगार निर्मितीस चालना मिळाली असल्याचे नमूद केले. मॅग्नेट 2.0 बाबत चर्चा करताना राज्यातील कृषीमालास आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळण्याकामी शेतकरी उत्पादक संस्थांसाठी उत्तम कृषी तंत्रज्ञान, कृषिमालाची हाताळणी, पायाभूत सुविधा, पॅकेजिंग, ब्रँण्डींग, जागतिक स्तरावरील कृषी मूल्य साखळ्यांचा अभ्यास, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संस्थात्मक बळकटीकरण, पोषकतत्व आधारीत बाजारपेठ, कार्बन क्रेडीट, हवामान अनुकूल धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील ग्रामीण स्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधांची उभारणी, तसेच शहर स्तरावरील मोठ्या बाजारसमित्यांमध्ये डिजिटायझेशन, घनकचरा व्यवस्थापनाचा अवलंब या बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. तसेच महिला सक्षमीकरणाबाबत आशियाई विकास बँकेचे अधिक सहकार्य मिळण्यासाठी राज्य शासनामार्फत विकसित महाराष्ट्र व्हिजन 2047 च्या अनुषंगाने पणन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

प्रकल्पाच्या प्रगती तपासणीसाठी आशियाई विकास बँकेचे शिष्टमंडळ दि. 19 ते 27 जानेवारी 2026 या कालावधीत महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. क्रिशन रौटेला यांच्या अध्यक्षतेखालील या शिष्टमंडळामध्ये श्रीमती प्राची शर्मा, बॅण्डो एंजेलीस, मॅरी मागरिट, श्रीमती टोकोमो काटो, श्री. नायर, श्रीमती अनिता कुमारी, गोविंद देसाई, सुमित राठोड, अखिलेश सम्याल, गुरविंदर सिंग, भुवनेश्वरी बालसुब्रमण्यम यांच्यासमवेत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, एनआयपीएचटीचे संचालक मिलींद आकरे, प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव आदींचा सहभाग होता.

या शिष्टमंडळाने विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात उभारणी करण्यात आलेल्या निवडक प्रक्रीया प्रकल्प तसेच राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथे प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान प्रकल्प लाभार्थी आणि विशेषत: महिला सभासदांशी चर्चा करुन प्रकल्पाकडून अन्य कोणत्या प्रकारचे सहकार्य अपेक्षित आहे, याबाबत माहिती घेतली.

मॅग्नेट प्रकल्पाच्या मुख्य उद्देशांमध्ये राज्यातील 14 फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मुल्यसाखळ्यांमध्ये खाजगी गुंतवणूक आकर्षित करुन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे व त्यांची साठवणूक क्षमता वाढविणे, मागणीनुसार मालाची मूल्यवृद्धी करणे आणि वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे, शेतकरी उत्पादक संस्थांचा मूल्यसाखळीतील सहभाग वाढविणे यांचा प्रामुख्याने समावेश आहे.



## ग्रंथ हे मनुष्याचे सच्चे मित्र – राज्यपाल आचार्य देवव्रत

■ 'घोस्ट्स, हॉरर अँड हिल्स' कथासंग्रहाचे प्रकाशन

मुंबई : (समर्थ गांवकरी)

समाजमाध्यमे प्रभावी असली तरीही, ग्रंथ हे माणसाचे सच्चे मित्र असून ग्रंथ वाचनाच्या माध्यमातून शांती व आंतरिक खंबीरता लाभते, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते 'घोस्ट्स, हॉरर अँड हिल्स' या कथासंग्रहाचे प्रकाशन लोकभवन येथे करण्यात आले. 'हाय ऑन कसोल' या पुस्तकाचे लेखक, पत्रकार व अध्यापक आदित्य कांत हे या पुस्तकाचे लेखक आहेत. पुस्तकाचे नाव जरी गुढ व भयप्रद वाटत असले तरी पुस्तकातील 18 कथांच्या माध्यमातून लेखकाने सामाजिक कार्य व सकारात्मकतेचा संदेश दिला आहे. लेखकाने या लोककथांचा उपयोग करून हृदयस्पर्शी कथा लिहिल्या असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

संवेदनशीलता ही मानवाची सर्वात मोठी ओळख असून साहित्याच्या माध्यमातून युवकांमध्ये संवेदनशीलतेची भावना वृद्धिंगत झाली तर त्यातून समाजात सकारात्मक परिवर्तन होईल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

कोरोना काळात जीवन मरणाशी लढताना तशाही स्थितीत कोरोना रुग्णांना मदत करण्याची आंतरिक इच्छा होती अशी भावना लेखक आदित्य कांत यांनी यावेळी सांगितले.

पुस्तक प्रकाशन सोहळ्याला रेड चिलीज एन्टरटेन्मेंटच्या व्यवसाय व्यवस्थापिका करुणा बडवाल, संगीतकार संजीव वाधवानी व चित्रपट निर्माते राजन खोसा यासह मनोरंजन व माध्यम क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## विश्वबंधुत्वाचा भाव प्रदर्शीत करणारा महाराष्ट्राचा ५९वा निरंकारी संत समागम भव्य रुपात संपन्न!

### सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कौस्तुभ पुरस्काराने सन्मानित!

■ शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्रत्येक युगाची आवश्यकता – निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

सांगली : (समर्थ गांवकरी)

समागमाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ष 2026 चा प्रतिष्ठित "कौस्तुभ पुरस्कार" सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री माननीय श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते प्रदान केला गेला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक श्री.संजयजी भोकरे, डिजिटल मीडिया अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, दैनिक समर्थ गांवकरी महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, सागर बोधगिरे,विश्वनाथ कोकणे, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला !



हा तीन दिवसीय 59वा वार्षिक निरंकारी संत समागम 26 जानेवारी रोजी सांगलीमध्ये भव्य रुपात यशस्वीरित्या संपन्न झाला. समागमाच्या समापन सत्रामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी लक्षावधी भाविक भक्तगणांना संबोधित करताना सांगितले, की शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्राप्त करुन जीवनात प्रेम, दया आणि करूणेचा भाव अंगीकारणे ही प्रत्येक युगाची आवश्यकता राहिली आहे. सतगुरु माताजी म्हणाल्या, की मानवाचा दृष्टिकोण बहुधा नकारात्मक होऊन जातो. त्यामुळे तो चांगुलपणामध्येही दोष शोधत राहतो. याउलट संतजन परमात्म्याच्या जाणीवेमध्ये जगून अंधारातही प्रकाश किरणाला आधार बनवतात. ब्रह्मज्ञानाद्वारे ते स्वत:चे जीवन उज्वल करतातच, शिवाय समाजालाही प्रकाशमान करतात. संतांच्या जीवनाचे वैशिष्ट्य समजावताना माताजी म्हणाल्या, की संतांचे जीवन दिखावा, कट-कारस्थानापासून मुक्त आणि सहज, सरळ व सकळांच्या कल्याणासाठी समर्पित असते. सतगुरु माताजींनी निरंकारी भक्तांना सत्संग, सेवा व सिमरणाच्या माध्यमातून आत्ममंथन करत सजग व सकारात्मक जीवन जगण्याचे आवाहन केले.

समागमाची क्षणचित्रे, कवि दरबार : समागमाच्या तिन्ही दिवशी "आत्ममंथन" या विषयावर कवि दरबाराचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये देश-विदेशातील एकंदर 22 कवी व कवियित्रींनी मराठी, हिंदी, पंजाबी, हरियाणवी, भोजपुरी व इंग्रजी भाषांच्या माध्यमातून काव्य पाठ प्रस्तुत केला ज्याचा भरपूर आनंद श्रद्धाळु भक्तांनी प्राप्त केला.

निरंकारी मिशनच्या नूतन साहित्याचे प्रकाशन : समागमाच्या पहिल्या दिवशी सत्संग कार्यक्रमा दरम्यान सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या करकमला द्वारे समागम विशेषांक "आत्ममंथन" आणि 'गुरूदेव हरदेव' या पुस्तकाची नूतन भाषांतर आवृत्ती तसेच अन्य पुस्तकांच्या भाषांतर आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या सर्व प्रकाशन सामग्री व मिशनच्या पत्र-पत्रिका समागम मध्ये लावलेल्या प्रकाशनाच्या 6 स्टॉल्सवर अत्यंत माफ़क दरात उपलब्ध आहेत ज्याचा लाभ श्रद्धाळू भक्तगण मोठ्या उत्साहाने घेत आहेत.

सेवादल रॅली : समागमाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात एका आकर्षक सेवादल रॅलीने झाली ज्यामधेय महाराष्ट्रासह अन्य ठिकाणांहून आलेल्या हजारो सेवादल बंधु-भगिनी आपआपली खाकी-निळी वर्दी परिधान करून सहभागी झाले होते. सतगुरू माताजी व निरंकारी राजपिताजींचे रॅलीमध्ये आगमन होताच मंडळाच्या सेवादल आधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन या दिव्य युगुलाचे सहर्ष स्वागत केले.

सेवादल रॅलीच्या प्रारंभी सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या करकमलाद्वारे शांतीचे प्रतिक असणारा मिशनचा श्वेत ध्वज फ़डकवला. या रॅलीमध्ये बँण्डच्या सूरात पी.टी. परेड, संगीतमय योगा, मानव पिरॅमिड, मल्लखांब, एरोबिक, उम्ब्रेला फॉर्मेशन तसेच अनेक विविध खेळ प्रकार व साहसी कवायती प्रस्तुत केल्या.

त्याचबरोबर मिशनच्या शिकवणीवर आधारित विविध भाषांच्या माध्यमातून लघु नाटिका सादर करण्यात आल्या ज्याद्वारे भक्तीमधील सेवेचे महत्व अधोरेखित केले गेले तसेच अहंकार रहित होणे, सेवेमधील चेतनता व आदर भाव इत्यादी दिव्य गुण धारण करण्याची प्रेरणा देण्यात आली.

सेवादल व श्रद्धाळू: भक्तगणांना संबोधित करताना सतगुरू माता सुदीक्षाजी महाराजांनी प्रतिपादन केले, की जीवनात निराकार परमात्म्याला प्राथमिकता देत समर्पित भावनेने सेवा करायची आहे. सेवा केवळ एक कार्य नसून ते पूर्ण मनोभावे श्रद्धा व सत्कार भावनेने करायची भावना आहे. सेवेच्या सोबत जीवनात सत्संगला महत्व देणे सुद्धा सेवेचेच एक रूप आहे. सेवेच्या मूळ भावनेला समजून केले गेलेले कार्यच जीवनामध्ये सुधार करते.

### स्वास्थ्य सेवा

समागम स्थळावर तीन डिस्पेंसरी, दोन प्राथमिक चिकित्सा केंद्र तसेच आईसीयू सुविधेसहित हॉस्पिटलची व्यवस्था केलेली होती. ॲलोपॅथी, आयुर्वेद व होमिओपॅथी पद्धतिने जवळ जवळ 50,000 भाविकांना स्वास्थ सेवा प्रदान केल्या गेल्या. या व्यवस्थेमध्ये 54 डॉक्टर्स व 326 चिकित्सा कर्मचारी कार्यरत होते. आपत्कालीन परिस्थितीत सेवेसाठी 11 ॲम्ब्युलन्स तैनात होत्या. प्रशंसनीय आहे, की कायरोप्रॅक्टिक चिकित्सा शिबिरामध्ये विदेशातून 23 तर भारतातून 2 विशेषज्ञांनी आपल्या निष्काम सेवा प्रदान केल्या. तीन दिवसांमध्ये जवळपास 3,000 भाविकांनी या चिकित्सेचा लाभ घेतला.

निरंकारी प्रदर्शनी : समागमात उभारलेली भव्य निरंकारी प्रदर्शनी श्रद्धाळूंच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहे. या वर्षी सदर प्रदर्शनी 'आत्ममंथन' या विषयावर आधारित असून ज्यामध्ये आत्मचिंतन, आत्मबोध आणि मानवी मुल्यांचे महत्व अत्यंत प्रेरणादायी पद्धतीने प्रस्तुत केले आहे.

ही प्रदर्शनी मुख्यतः तीन भागांमध्ये विभागली आहे. तिच्या मुख्य भागात मिशनचा इतिहास, विचारधारा तसेच देश-विदेशात केले जाणारे मानवतेसंबंधी निष्काम सेवा कार्यांचे प्रतिबिंब दर्शवले आहे. दुसऱ्या भागात "बाल-प्रदर्शनी" उभारली असून त्यामध्ये बालकांना उज्वल जीवन जगण्याची प्रेरणा देणारे शिक्षाप्रद आकर्षक मॉडेल्स बनवले आहेत ज्याचा उल्लेख निरंकारी राजपिताजी यांनी आपल्या विचारांमध्येही केला. प्रदर्शनीच्या तिसऱ्या भागात मिशनची समाजकल्याण शाखा 'संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन'च्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनीचा समावेश आहे.

लंगर व कँटीन व्यवस्था : समागमात येणाऱ्या सर्व श्रद्धाळूंसाठी दिवस-रात्र सामूहिक भोजनाची (लंगर) व्यवस्था मैदानाच्या तिन्ही भागांमध्ये केली आहे. एका लंगर स्थानावर एकाच वेळी जवळपास 10,000 श्रद्धाळू भोजन करू शकतात. या व्यतिरिक्त 4 कँटीनची व्यवस्था करण्यात आली आहे ज्यामध्ये अत्यल्प दरात चहा, कॉफी, शीत पेय व अल्प-उपहार उपलब्ध आहेत. मिनरल वॉटरची देखील उचित व्यवस्था याच कँन्टीनमध्ये करण्यात आली आहे.

# ह. भ. प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांच्या किर्तनाने हजारो भाविक झाले मंत्रमुग्ध

## कै. मारोतराव हंबर्डे यांना मान्यवरांकडून अभिवादन




**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

कै. मारोतराव होनाजी हंबर्डे यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि रह जानेवारी सोमवार रोजी सकाळी १० वा. ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांचा भव्य कीर्तन सोहळा पार पडला. कै. मारोतराव होनाजीराव हंबर्डे यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायाचा प्रसार व प्रचार केला. देव देश धर्माची सेवा केली. त्यांच्या स्मरणार्थ गेल्या १४ वर्षापासून हंबर्डे परिवाराच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. दि २६ जानेवारी रोजी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज (मालेगाव,नाशिक) यांच्या अमृतवाणीतील कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी पालकमंत्री अतुल सावे, खासदार डॉ. अजित गोपछडे, ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगावकर , हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर संघटन मंत्री संजय कोडगे,आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ.बालाजी कल्याणकर,आ. आनंद बोढारकार,भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजूरकर,माजी आ ओमप्रकाश पोकर्णा ,जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, चैतन्य बापू देशमुख यांच्यासह आजी -माजी खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी,नवनिर्वाचित नगरसेवक तसेच जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आध्यात्मिक, आर्थिक, औद्योगिक, व्यापार आणि विविध क्षेत्रांतील सर्व मान्यवर, हंबर्डे परिवारावर प्रेम करणारा परिवार हजारोंच्या संख्येने उपस्थित होता. सहयोग एज्युकेशन कॅम्पस येथे आयोजित या भव्य दिव्य सोहळ्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ .संतुक हंबर्डे व परिवाराच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांच्या सुश्राव्य व समाज प्रबोधनात्मक कीर्तनाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते. तत्पूर्वी पालकमंत्री अतुल सावे,खासदार डॉ. अजित गोपछडे व संघटन मंत्री संजय कोडगे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मारोतराव होनाजी हंबर्डे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांचा आशीर्वाद घेतला. दु १ ते सायं ६ वा. पर्यंत हजारो नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारत लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



नांदेड जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या निधीतून जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत असलेल्या विष्णुपुरी पशु वैद्यकीय दवाखाना इमारत लोकार्पण सोहळा दि २६ जानेवारी रोजी डॉ.संतबाबा हरजिदरसिंघजी व राजेजी रामा गयानोजी ठाकूर व सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे व ऊपसरपंच सौ. अर्चना विश्वनाथ हंबर्डे ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

जिल्हा नियोजन विकास कार्यक्रम अंतर्गत विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारत पाच खोल्यांचे बांधकाम असलेली इमारत ही अकरा गावातील पशुधनाचा उपचार व संगोपनासाठी असून या इमारतीच्या लोकार्पण सोहळा दि २६ जानेवारी रोजी संपन्न झाला, यावेळी ध्वजारोहण सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे व ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांच्या हस्ते करण्यात आले तर उपस्थितांचे स्वागत पशुधन वैद्यकीय अधिकारी राजश्री जाधव यांनी केले. यावेळी सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, ऊपसरपंच विश्वनाथ हंबर्डे, सोमभारती महाराज, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे,लक्ष्मण ठाकूर,प्रकाश हंबर्डे,माजी सरपंच संतोष बारसे, माजी सरपंच जनाबाई शेबोले, मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव, भगवान सोळंके,चांदु वाहुळकर, संतोष हंबर्डे, माधवराव हंबर्डे,राजु हंबर्डे ,बालाजी हंबर्डे,विलास भोसले, नारायण कांबळे,नारायण हंबर्डे,अमृतराव हंबर्डे ,पोलीस पाटील प्रविण हंबर्डे, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे यांच्या सहग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन झालेल्या इमारती मुळे पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत जवळपास अकरा गावातील ग्रामस्थांचा पशुधनावर उपचार व संगोपनासाठी मदत होणार आहे.

# विद्यार्थ्यांचा 'स्नेहतरंग' सोहळा उत्साहात



**भोकर : (समर्थ गांवकरी)**

भोकर येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेच्या सन १९९६ ते २००६ (इयत्ता पहिली ते दहावी) या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा 'स्नेहतरंग' सोहळा उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक सुरज केंद्रे होते. यावेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक घुगे सर व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक कांगणे सर उपस्थित होते. आदरणीय शिक्षकांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा सन्मान करत कृतज्ञता व्यक्त केली. या सोहळ्याच्या निमित्ताने शाळेला सामूहिक प्रतिमा भेट देण्यात आली तसेच 'एक झाड – एक विद्यार्थी' उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात ७० झाडांची लागवड करण्यात आली. ही लागवड माजी विद्यार्थी व विभागीय वन अधिकारी संदीप बाबू चव्हाण यांच्या सहकार्याने झाली. स्नेहभोजनाचे आयोजन माजी विद्यार्थी व उद्योजक अविनाश अमिलकंठवार यांच्या मदतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय खंदारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

वैजापुर तालूक्यातील महालगाव येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूलमध्ये ७७ वा स्वातंत्रदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक जे. बी. नारळे यांच्या हस्ते ध्वजावंदन करण्यात आले. यावेळी माजी शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे, यांसह शालेय समितीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. धजावंदना नंतर प्रशालेतील क्रिडाशिक्षक श्रीकांत मुके यांच्या मार्गदर्शनात संगीतमय कवायत घेण्यात आली त्याचप्रमाणे देशभक्तीपर गीताच्या चालीवर क्रिडा शिक्षक श्रीकांत मुके सर यांनी बसविलेले लेझिम नृत्य ७७ व्या स्वातंत्र्यदिनाचे आकर्षन ठरले त्यानंतर प्रशालेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



पीएमश्रीजिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी ही शाळा जिल्ह्यातच नाही तर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात लातूर विभागात प्रथम आलेली सर्वगुणसंपन्न शाळा असून, ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाचा कार्यक्रम डॉ.संतबाबा हरजिंदर सिंघजी यांच्या उपस्थितीत अतिशय थाटात संपन्न झाला.

महाराष्ट्र शासनाच्या सामूहिक कवायत उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायतीचे सादरीकरण केले आणि या सामूहिक कवायतीचे ड्रोन द्वारे शूटिंग करण्यात आली. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय पुणे येथील शिक्षण उपसंचालक शिंदे, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे , गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड सुधीर गुट्टे , यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानंतर माजी आमदार मोहन हंबर्डे यांच्यातर्फे त्यांचे वडील कै.मारोतराव होनराव हंबर्डे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मातोश्री राधाबाई मारोतराव हंबर्डे यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे मोहन मारोतराव हंबर्डे यांच्यातर्फे गेल्या १४ वर्षापासून त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ इंग्रजी विषयांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास २१ हजार रोख रक्कम बक्षीस्वरूपी देऊन दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार करण्यात येतो. यावर्षी सुद्धा गच्चे कार्तिक शुद्धोधन या गुणवंत विद्यार्थ्यास आपल्या मातोश्रीच्या उपस्थितीत बक्षीस देऊन सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला भार्गव विजय राजे ,संचालक भार्गव करिअर अकॅडमी यांची विशेष उपस्थिती होती.

त्यानंतर शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, व इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत वेगवेगळ्या विषयांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस्वरूपी रोख रक्कम देऊन, सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना मोहन हंबर्डे यांनी सांगितले की, इंग्रजी भाषा ही एक आंतरराष्ट्रीय भाषा असून ज्या विद्यार्थ्याला इंग्रजी बोलता येते, इंग्रजी कळते तो विद्यार्थी जगात कुठेही आणि कोणत्याही क्षेत्रात मागे पडू शकत नाही, या शब्दात इंग्रजी विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. दरवर्षीप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आणि शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर गीत आणि नृत्य सादर केले.

# सद्गुरू समर्थ नारायणगिरी गुरु बाळगीर महाराजांच्या मार्गदर्शनात नांदेड–माहूर पायी दिंडीला अभूतपूर्व प्रतिसाद

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

गाडीपुरा, नांदेड येथून माहूर येथील श्री क्षेत्र रेणुका देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या पायी दिंडीला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून, हजारो भाविकांचा भक्तिमय जथा नांदेडवरून माहूरकडे मार्गस्थ झाला आहे. श्री श्री श्री 1008 अष्ट कौशल्य सन्मानित सद्गुरू समर्थ नारायणगिरी गुरु बाळगीर महाराज यांच्या काटेकोर नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि आध्यात्मिक मार्गदर्शनामुळे ही दिंडी भक्ती, सेवा आणि शिस्त यांचा आदर्श ठरत आहे.



दिंडीमध्ये श्री गुरुदत्ताची पालखी, भजनी मंडळ, वारकरी, महिला, युवक, वृद्ध अशा सर्व वयोगटातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. मार्गक्रमणादरम्यान रोज सकाळ-संध्याकाळ भजन, हरिनामाचा जागर, नामस्मरण, प्रवचन यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारून जात आहे. मुक्कामाच्या ठिकाणी विधीवत अनंत महापूजा करून भाविक आध्यात्मिक समाधान अनुभवत आहेत.

दिंडीच्या सुरक्षिततेसाठी व भाविकांच्या आरोग्यासाठी आरोग्य रथाची विशेष व्यवस्था डॉ . हिवराळे यांच्या माध्यमातून करण्यात आली असून, मार्गात जागोजागी भाविकांकडून फलाहार, उपहार व महाप्रसादाचे आयोजन केले जात आहे. या सेवाभावी उपक्रमांमुळे दिंडी म्हणजे केवळ पदयात्रा न राहता एक राष्ट्रीय एकोपा जपणारी सामाजिक व आध्यात्मिक चळवळ बनल्याचे चित्र दिसून येत आहे.

सद्गुरू समर्थ नारायणगिरी गुरु बाळगीर महाराज यांच्या नेतृत्वाखाली दिंडीतील प्रत्येक घटकात शिस्त, संयम व भक्तिभाव दिसून येतो. "नामस्मरणातूनच जीवन शुद्ध होते" हा त्यांचा संदेश दिंडीतील भाविकांच्या आचरणातून प्रत्ययास येत आहे.

नांदेड ते माहूर या पवित्र मार्गावरून जाणारी ही दिंडी भक्ती, एकात्मता आणि राष्ट्र सेवाभावाचे दर्शन घडवत असून, सद्गुरू समर्थ नारायणगिरी गुरु बाळगीर महाराज यांच्या आध्यात्मिक कार्याचा ठसा हिंदू धर्म जनजागृतिच्या माध्यमातून समाजमनावर अधिक मोलाचा ठरत आहे.

# ७ फेब्रुवारीला विशेष बैठक

**नाशिक: (समर्थ गांवकरी)**

नाशिक महानगरपालिकेसह मालेगाव, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव महानगरापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीसाठी दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तर मालेगाव महापालिका महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता संबंधित महापालिकेच्या सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत. महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी विशेष बैठकीचे पीठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल, अशी तरतूद आहे. त्या अनुषंगाने संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पीएम श्री जि.प. हायस्कूल, विष्णुपूरी येथे अत्याधुनिक संगणक प्रयोग शाळेची स्थापना

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



शिक्षण संचालक (प्राथमिक) विभाग पुणे यांच्या पुरवठा आदेशानुसार Ideal Center Computer Lab या योजनेअंतर्गत पीएम श्री जि.प. हायस्कूल, विष्णुपूरी, ता. व जि. नांदेड येथे अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळेची स्थापना शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी करण्यात आली आहे,

सदर योजनेअंतर्गत M/s Digital Den, पुणे यांच्यामार्फत शाळेस २५ डेस्कटॉप संगणक व १ Interactive Board चा यशस्वीरीत्या पुरवठा करण्यात आला आहे. प्राप्त सर्व संगणक व डिजिटल साधने कार्यक्षम अवस्थेत असून विद्यार्थ्यांच्या डिजिटल शिक्षणासाठी सज्ज करण्यात आलेली आहेत. या संगणक प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना संगणक साक्षरता, डिजिटल कौशल्ये, ऑनलाईन शिक्षण व आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. पीएम श्री योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. यावेळी मुख्याध्यापक उज्वला जाधव, सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, पर्यवेक्षक शिवाजी वेद पाठक, माजी सरपंच संतोष बारसे, शिक्षक संतोष देशमुख,माहादेव कांबळे यांच्या सह मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शाळा समिती अध्यक्ष आणि सदस्य शासनाचे व शिक्षण विभागाचे आभार मानून, या सुविधेचा विद्यार्थ्यांनी योग्य उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# जि. प. शाळा दगडसांगवी येथे शैक्षणिक साहित्य वाटप



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून तुळशीराम पाटील मोरतळे मित्र मंडळातर्फे जि. प. शाळा दगडसांगवी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मित्र मंडळातील सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यामध्ये धोंडीबा फाजगे, आकाश फाजगे, संतोष फाजगे, प्रकाश फाजगे, कृष्णा मोरतळे , पांडुरंग मोरतळे ,प्रमेशोर पाटील मोरतळे ,विशाल मोरतळे ,विशाल फाजगे, राहुल फाजगे, संभाजी निटोरे, फाजगे, , पांडुरंग हाके, खंडू हाके आदींचा समावेश होता. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक व ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती. यामध्ये ,शिवाजी पाटील फाजगे (माजी पोलीस पाटील), भानुदास पाटील फाजगे (तंटामुक्ती अध्यक्ष), प्रल्हाद शंकर पाटील फाजगे, मनोहर पाटील फाजगे (चेअरमन), संग्राम पाटील फाजगे, शहाजी पाटील फाजगे , उत्तमराव पाटील फाजगे तसेच शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# भाजपा व्यापारी आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यावतीने नगरसेवकांचा सन्मान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आडते बाजार, सरदार पटेल चौक येथे भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. अहिल्या नगर महानगरपालिका निवडणुकीत युतीला मिळालेल्या नेत्रदीपक यशानिमित्त भाजपा व्यापारी आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या निवडणुकीत आमदार संग्राम जगताप, माजी खासदार सुजय विखे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली युतीने उल्लेखनीय यश संपादन केले. त्या यशाची परंपरा या प्रभागात कायम राखण्यात यश आल्याबद्दल नवनिर्वाचित नगरसेवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रदेश महिला सचिव गीता गिल्डा, भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक गायकवाड, महावीर कांकरिया, अनिल गट्टाणी, नगरसेविका शीतल ढोणे, माजी उपमहापौर गीतांजली काळे,सौ. आशा डागवाले, मयुरी सुशांत जाधव, नगरसेवक सागर मुर्तडकर, माजी महापौर व नगरसेवक बाबासाहेब वाकळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

अनिल गट्टाणी म्हणाले, "व्यापारी आघाडीच्या वतीने आम्ही नेहमीच विकासाभिमुख निर्णयांना पाठबळ देत आलो असून, पुढील काळातही नगरसेवकांच्या माध्यमातून परिसरातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. सर्वांच्या सहकार्याने आडते बाजार परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असे त्यांनी स्पष्ट केले.

सुवेंद्र गांधी म्हणाले की, "आडते बाजार परिसर हा व्यापारी दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा भाग आहे. या परिसरातील व्यापारी व नागरिकांनी भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस युतीवर जो विश्वास टाकला, त्यातूनच आज नवनिर्वाचित नगरसेवकांच्या रूपाने सक्षम नेतृत्व मिळाले आहे."

यावेळी सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी आपल्या मनोगतात मतदार, व्यापारी बांधव व कार्यकर्त्यांचे आभार मानले. "आडते बाजार परिसरातील नागरिकांनी व व्यापारी वर्गाने आमच्यावर दाखवलेला विश्वास आम्ही कधीही व्यर्थ जाऊ देणार नाही. परिसरातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था तसेच व्यापाऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्राधान्याने काम केले जाईल," असे त्यांनी सांगितले.

तसेच भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या माध्यमातून विकासाभिमुख व लोकहिताचे निर्णय घेण्यात येतील.पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजी खासदार सुजय विखे व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.घरपट्टी व पाणीपट्टी विषयावर चर्चा झाली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महावीर कांकरिया अनिल गट्टाने यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे यांनी केले. त्यांनी युतीच्या यशामागील संघटनात्मक ताकद व कार्यकर्त्यांचे योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या शेवटी विलास गांधी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पियूष जग्गी, चेतन जग्गी, सागर मुनोत, हरी बिहाणी, अनिल बिहाणी, दर्शन बिहाणी, महावीर कांकरिया, जयपाल लुणावत, गोपाल मालपाणी, ओंकार बिहाणी, सुनील नागोरी, रोहन गट्टाणी, सुभाष संकलेचा, संतोष गांधी, श्रीचंद सचदेव, सुरेंद्र गांधी, शुभम गट्टाणी, धीरज पोखरणा, गणेश लढ्ढा, बाळुशेठ मालू, विलास गांधी, शरद मुर्तडकर, विनोद भिंगारे, ललित कटारिया, जय सचदेव, सुशांत जाधव, अजय ढोणे, सुभाष शेटे आदी व्यापारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योजनांच्या अंमलबजावणीतून लोकशाही मूल्यांची जपणूक

## अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर

### राहाता तहसील कार्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात ; गुणवंतांचा गौरव

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. प्रशासकीय कामकाज पारदर्शक, वेगवान व लोकाभिमुख करणे हेच संविधानातील तत्त्वांचे खरे पालन आहे. या अनुषंगाने प्रशासनाची वाटचाल वेगाने 'ई-प्रशासन' कडे सुरू असून, नागरिकांना शासकीय सेवा त्यांच्या दारी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. जनतेचा त्रास कमी करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले. भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राहाता तहसील कार्यालय येथे अपर जिल्हाधिकारी श्री. कोळेकर यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा उत्साहात संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता काशिनाथ गुंजाळ, माहिती अधिकारी सुरेश पाटील, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. श्री. कोळेकर म्हणाले, लोकशाहीत विकासाचे फायदे तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते योजने'ला प्राधान्य दिले आहे. शेतातील रस्ते बारमाही व मजबूत करून शेतकऱ्यांच्या शेतमालाला हक्काची बाजारपेठ मिळवून देणे, हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानात न्याय व समता ही लोकशाहीची प्रमुख मूल्ये आहेत. युवकांनी व्यसनमुक्त होऊन राष्ट्रउभारणीत योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी पोलीस दल व विद्यार्थी पथकाच्या शिस्तबद्ध संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी केवळ मनोरंजन नव्हे, तर सामाजिक प्रबोधनावर भर दिला. विशेषतः जि.प. प्राथमिक शाळा धनगरवाडीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली 'संविधानाचा गोंधळ' ही नाटिका उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. तसेच शारदा कन्या विद्यालय, जि.प. शाळा गोदावरी वसाहत, जि.प. शाळा केलवड व साध्वी प्रीतीसुधाजी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते आणि नृत्याविष्कार सादर केले.

लोकशाही प्रक्रियेचा कणा मानल्या जाणाऱ्या व विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये मोहसीन शेख, नंदकुमार बनसोडे, आकाश वाघमारे, संजय तांबे, रेखा गायकवाड व पर्यवेक्षक सोमनाथ येलमामे यांचा समावेश होता. तसेच कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या कृषी सखी व अधिकाऱ्यांचाही (मनिषा गोडगे, संदीप निर्मळ, मिना जाधव, विनायक भाकरे, राजदत्त थोरे) गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार हेमंत पाटील यांनी केले. याप्रसंगी नायब तहसीलदार सुधाकर ओहोळ, बाळासाहेब मुळे तसेच विविध विभागांचे अधिकारी, पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बारड येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

दिः २६ जानेवारी, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, स्वा.से.राजाराम बापू मा.शाळा व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या प्रांगणात शिक्षण संस्थेचे सचिव रामेश्वर कोरबनवाड व सहसचिव अशोक गव्हाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी शिक्षणसंस्था अध्यक्ष संजय देशमुख, उपाध्यक्ष रमेशचंद्र महाजन , कोषाध्यक्ष गौतम आठवले , भगवान कांजाळे, भगवान मुलंगे,मारुती कांबळे, नागोराव गुरुजी, इरलेवाड गुरुजी आणि सर्व संचालक मंडळ , गावातील प्रतिष्ठित नागरिक, प्राचार्य हेमंत इंगळे, मुख्याध्यापक रामकिशन चुब्बेवार सर्व शाळा व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शालेय स्तरावरील स्वयंशासन दिन ,वर्षभरातील परिपाठ, प्रश्नमंजुषा मध्ये प्रथम व द्वितीय आलेल्या या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी स्वातंत्र्य सैन्यांनी राजारामबापू माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी झाकीच्या माध्यमातून लेझीम सादरीकरण, स्वच्छता अभियान ,मतदान जागृती ,कॉपी मुक्ती अभियान ,व्यसनमुक्ती अभियान, भारतीय शेतीसाठी बैलाचे योगदान, वाहतुकीचे नियम, वृक्षारोपन काळाची गरज इत्यादी संदेश झाकीच्या सादरीकरणात विविध देखाव्यांच्या व पथ नाट्याच्या माध्यमातून संपूर्ण बारड गावात राबवून जागृती करण्यात आली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहशिक्षक भगवान कदम व कु. माधुरी पुयड या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रा. कैलाश कपाटे यांनी व्यक्त केले.

# दशक्रिया विधीतील अनावश्यक भाषणांना पूर्णविराम

## पसायदानातून सामूहिक श्रद्धांजली देण्याचा आदर्श निर्णय!

**कळस : (समर्थ गांवकरी)**

प. पूज्य ब्रह्मलीन सुभाष पुरी जी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कळस गावात कै. रामनाथ धोंडीबा वाकचौरे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त एक महत्त्वपूर्ण व आदर्श निर्णय घेण्यात आला. कळस गावातील सर्व ग्रामस्थ, तसेच कै. रामनाथ धोंडीबा वाकचौरे यांचा परिवार व भावकीतील सदस्य यांच्या संयुक्त चर्चेतून हा निर्णय सर्वानुमते स्वीकारण्यात आला.



या निर्णयानुसार, दशक्रिया विधीच्या प्रवचनानंतर श्रद्धांजलीपर अनेक वैयक्तिक भाषणे देण्याची पद्धत पूर्णतः बंद करण्यात आली आहे. यापुढे, गेलेल्या व्यक्तीची संपूर्ण माहिती, त्यांच्याशी असलेला जिव्हाळा व प्रेम ज्यांना आहे अशा फक्त एका व्यक्तीस दिवंगतांचा परिचय करून देण्यासाठी दोन शब्द बोलण्याची परवानगी देण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही व्यक्तीने स्वतंत्रपणे श्रद्धांजली देऊ नये, तर पसायदानाच्या माध्यमातून सामूहिक श्रद्धांजली अर्पण करावी, असा निर्णय घेण्यात आला.

या पद्धतीमुळे दुःखात सहभागी होण्यासाठी आलेल्या सर्व व्यक्तींना पसायदानाच्या रूपाने श्रद्धांजली अर्पण करता येते, तसेच वेळेची बचत होऊन विधीतील शिस्त व पवित्रता कायम राहते. कळस गावातील धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत पदाधिकाऱ्यांनीही या निर्णयाला पाठिंबा दिला.

कै. रामनाथ धोंडीबा वाकचौरे यांच्या आज झालेल्या दशक्रिया विधीसाठी उपस्थित असलेल्या नागरिकांनी या निर्णयाचे मनापासून कौतुक करून स्वागत केले. हा निर्णय आदर्श असून इतर गावांनीही अवलंब करण्याजोगा असल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

कळस गावाने घेतलेल्या या सकारात्मक निर्णयामुळे दशक्रिया विधीत अनावश्यक श्रद्धांजली पर भाषणांना आजपासून कायमचा आळा बसला असून, पुढील काळातही ही पद्धत काटेकोरपणे राबविण्यात येणार असल्याचे गावातील जबाबदार व्यक्तींनी स्पष्ट केले आहे.

# डॉ. संतोष स्वामी यांना राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

शिक्षक व अधिकारी-कर्मचारी जिल्हा परिषद यांच्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत नांदेड येथील बाबानगर परिसरातील महात्मा फुले हायस्कूलचे क्रीडा शिक्षक डॉ. संतोष नागनाथआप्पा स्वामी यांनी राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 अंतर्गत शिक्षक व अधिकारी-कर्मचारी जिल्हा परिषद यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर येथे संपन्न झाल्या.

# किनवट नगर परिषदेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

- नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते ध्वजारोजन संपन्न
- सांस्कृतिक कार्यक्रमांनी वेधले लक्ष

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

प्रजासत्ताक दिनानिमित्त किनवट नगर परिषद येथे (दि२६) रोजी आयोजित ध्वजारोहन कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. विशेषतः सरस्वती विद्यामंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीमसह सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन



करून ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशभक्तीपर वातावरणात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे नियोजन नगर परिषदेचे मुख्याधिकारी मुगाजी काकडे व कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमानंतर नगर परिषदेच्या वतीने उपस्थित मान्यवरांसाठी अल्पोपहाराची तर विद्यार्थ्यांसाठी खाऊची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उपनगराध्यक्ष हसन खान पठान, ज्येष्ठ भाजपा नेते सुधाकर भोयर, युवा नेते करण येंड्रलवार, बाजार समितीचे उपसभापती राहुल नाईक, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, दिनकर चाडावार, दीपक नेम्मानिवार, सुनील पाटील, साजिद खान, गटनेते श्रीनिवास नेम्मानिवार, अभय नगराळे, सुरज सातुरवार, सभापती प्रीती धीरज नेम्मानिवार, नगरसेविका सरोजिनि ओह्विवार, सभापती श्रीराम नेम्मानिवार, नगरसेवक प्रविण राठोड, नगरसेवक अभय महाजन, नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार, यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार, मारोती मुनेश्वर, अकबर खान, इनायत भाटी, निसार भाटी, आदर्श जागरलावार, राजु सातुरवार, शिवा तिरमनवार, राजु बेजंकिवार, राजेश जोशी, अन्वर मिर्झा, मनिष ताडपेल्लीवार, मयुर सातुरवार, सतिष नेम्मानिवार, यांच्यासह ज्येष्ठ नागरीक रंगराव नेम्मानिवार, गोविंदराव सिरमनावार, वेंकन्ना माडपेल्लीवार अनेक मान्यवर उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नगर परिषद कर्मचा-यांनी कठोर परिश्रम घेतले. या कार्यक्रमास शहरातील प्रतिष्ठित नागरिक, माजी पदाधिकारी, माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कैलासनगर वळपाडा जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा!

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कैलासनगर वळपाडा येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी ध्वजारोहण करण्याचा मान दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांना देण्यात आला. हा कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक श्री. नाऊ मारूती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शाळेच्या प्रांगणात पार पडला. कार्यक्रमास भिवंडी महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका तथा माजी सरपंच सौ. गीता विठोबा नाईक, माजी



ग्रामपंचायत सदस्य श्री. संदीप मनोहर पाटील, श्री. दिपक हनुमान पाटील, माजी उपसरपंच सौ. वनिता अनिल पाटील, प्रसिद्ध उद्योजक श्री. अरुण बाळाराम पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच समाजसेवक श्री. विठोबा नाईक, साईनाथ पाटील, अनिल पाटील, दिनेश पाटील, मयूर पाटील, सत्यवान पाटील, दिनेश हेंदर पाटील, जितेंद्र पाटील, जयेश पाटील, महेश पाटील यांचीही उपस्थिती लाभली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विशाखा घाग, सहशिक्षिका सुषमा रामदास पाटील, अंगणवाडी सेविका सौ. संजना संजय पाटील, मदतनीस सौ. मनीषा पाटील, सौ. शुभांगी पाटील, मयुरी पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. विशाखा घाग यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सहशिक्षिका सुषमा रामदास पाटील यांनी केले. अध्यक्षीय भाषणात संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांनी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत संविधानाचे महत्व, देशभक्ती आणि सामाजिक जबाबदारी यावर मार्गदर्शन केले.हा संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर गाण्यांच्या नृत्याविष्कार वातावरणात आणि जल्लोषात पार पडला.

# राष्ट्रध्वजास मानवंदना

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शिर्डी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) माणिक आहेर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार मनोज भोसेकर, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, सहायक महसूल अधिकारी संतोष धोंगडे, सहायक महसूल अधिकारी शुक्लेश्वर ईजगे, ग्राम महसूल अधिकारी भाऊ पाटील जाधव, महसूल सहायक सूर्यकांत खोजे यांच्यासह महसूल विभागाचे इतर कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# बरबडा हाद्दीतील अवैध वाळू चोरी करणाऱ्याना कोण जबाबदार

## महसूल प्रशासन व तलाठी मंडळ अधिकारी या च्या आशिर्वादने प्रकार चालू ?

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा व सर्कल अंतर्गत असलेल्या अंतरगाव , मनुर , गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी व दिवसा वाळू , चोरी करणाऱ्याना वाळू माफियांना रान मोकळी केलीय काय बरबडा व टाकळी येथील तलाठी व महसूल प्रशासनाचे आशिर्वाद असल्याचे दिसून येत आहे अशी चर्चा दपक्या आवाजात सुरू आहे . उमरी तालुक्यातील व ईळेगाव व येळी , अंतरगाव , मनुर येथील वाळु माफीयांनी बरबडा हाद चोरी व तस्करी वाढली आहे.

या माफियांना ना कोणाचा धाक राहिला , ना कुणाची भिंती महसूल विभागाच्या वाळू माफिया रात्रीच्या दिवसाढवळ्या बरबडा वाडी अंतरंगाव भागातून चालू आहे वेळी वाळूची चोरी करून खुलेआम वाहतूक करत आहेत. बरबडा हादितील ईळेगाव येथील व येळी , मारतळा येथील

लोहा तालुक्यातील वाळू रात्रीला व मोठ्या प्रमाणात नायगाव तालुक्यातील बरबडा व बरबडा वाडी भागातून सर्कल अंतर्गत असलेल्या गावात नायगाव तहसिलचा अनागोंदी कारभारामुळे वाळू व अवैध वाहतूक होत आहे.

ती वाळू टिप्परमधून वाहतूक करुन विक्री केली जात आहे. गोदावरी पात्रातून दिवसाढवळ्या वाळू काढल्या जात आहे. चोरीने काढलेली वाळू नायगावच्या तहसीलदार यांनी चोरट्या मार्गाने वाळूचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्यांना रान मोकळे सोडले आहे. काय ? आशी चर्चा बरबडा व परिसरात सुरू आहे या सर्व बाबींकडे.पोलीस अधिक्षक अवीनाश. कुमार व तहसीलदारांनी डॉ . धमप्रिया गायकवाड याकडे लक्ष देऊन तत्काळ कारवाई करण्याची मागणी बरबडा व परिसरात गावकऱ्यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सर्वांचा सहभाग आवश्यक – पालकमंत्री अतुल सावे

### नूतनीकृत कॉन्फरन्स हॉलचे उद्घाटन व वॉर रूमची पाहणी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दि. २६ जानेवारी रोजी नांदेड जिल्ह्यातील सर्व सरपंच व ग्रामस्थांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. हे अभियान गावांच्या सर्वांगीण विकासासाठीची ऐतिहासिक संधी असून लोकसहभागातूनच ते यशस्वी होईल, असे प्रतिपादन नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.




जिल्हा परिषदेच्या नूतनीकृत कॉन्फरन्स हॉलचे उद्घाटन राज्याचे इतर बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार राजेश पवार, आमदार आनंद बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री अतुल सावे म्हणाले, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासाठी नांदेड जिल्हा परिषदेकडून उत्कृष्ट नियोजन करण्यात आले असून सर्व विभागांनी समन्वयाने प्रभावी कामगिरी केली आहे. स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार व लोकसहभाग या घटकांवर विशेष भर देण्यात येत आहे. या अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या गावाला थेट पाच कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असून, पंचायतराजच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या रकमेचे बक्षीस देण्यात येत आहे. प्रशासक म्हणून उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

शाळा स्तरावर सीसीटीव्ही बसविणे, मुलींसाठी स्वतंत्र शौचालय सुविधा उपलब्ध करणे, तसेच जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या नूतनीकरण व बांधकामासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही पालकमंत्री अतुल सावे यांनी दिल्या. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या वॉर रूमला भेट देऊन विविध विभागांच्या योजनांची माहिती असलेले बॅनर, आराखडे तसेच गावकऱ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी उभारलेली प्रणाली पाहून समाधान व्यक्त केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी या अभियानांतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली असून एका दिवसात हजारो जलतारा खड्डे तयार करण्यात आले आहेत. यासोबतच डिजिटल व स्मार्ट अंगणवाड्या, ग्रामपंचायतींमध्ये सीसीटीव्ही बसविणे, कर वसुलीसाठी क्यूआर कोडचा वापर, आरोग्य शिबिरे, शाळा व अंगणवाड्यांची दुरुस्ती असे उपक्रम प्रभावीपणे राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कॉन्फरन्स हॉलचे नियोजनबद्ध नूतनीकरण केल्याबद्दल कार्यकारी अभियंता संजय शिंदे, उपअभियंता बालाजी पवार, शासकीय कंत्राटदार विकी शिकारे व अधिराज चिंचवडकर यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त मुख्य कार्यकारी

या कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, मयूर आंदेलवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष देशमुख, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतसंस्था व तित्तीय संस्था तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालय यांना आमच्या अशिलांतर्फे ॲड. तेजस्विनी प्रशांत आडके, नाशिक यांना दिलेल्या माहिती व अधिकारावरून या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

| गट नं. | शिवार | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे. | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ८९ | मौजे कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | ०१ हे ८८ आर | १.३६ | महेश बाबासाहेब गांगर्डे |
| ९० | मौजे कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | ०१ हे ६१ आर | १.१९ | प्रविण कुमार अंकुश गांगर्डे |
| ९० | मौजे–कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | ०१ हे २० आर | ०.८९ | मिराबाई नवनाथ गांगर्डे |
| ९० | मौजे कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | पो.ख ०१ हे २० आर | ०.८९ | सुनिल विष्णु गांगर्डे |
| ९० | मौजे कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | ०१ हे ६० आर | १.१९ | प्रशांत अंकुश गांगर्डे |
| ९० | मौजे कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | ०० हे ४० आर | ०.३० | रामभाऊ कडु पाटिल |
| ९० | मौजे कोंभळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | ०० हे ४० आर | ०.३० | कृष्णा नवनाथ गांगर्डे |

या शेतमिळकतींबाबत वरील शेतजमीन धारक यांच्या सोबत २९ वर्षे भाडेपट्टा करार घेण्याचे ठरविले असून सदर वरील परिशिष्ट मधील नमूद मिळकतीबाबत कुणाची काही कायदेशीर हक्क, अधिकार तसेच सावकार, बँक संस्था पतसंस्था यांची काही घेणी असल्याबाबत कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आपल्याजवळ असलेले योग्य ते दस्तऐवज अथवा कागदपत्रांसह त्वरीत ॲड. तेजस्विनी प्रशांत आडके, पत्ता : चेंबर नं ५, लक्ष्मीनारायण हाईटस, हरिविश्व बिल्डींग शेजारी, एक्सप्रेस इन हॉटेल मागे, पाथर्डी फाटा, नाशिक. मो.नं. ८६६९०७१८४८, प्रत्यक्ष भेटून खात्री करून दयावी अथवा ईमेल adv.tejaswiniadke@gmail.com वर संपर्क साधून खात्री दयावी अथवा यांच्याकडे हरकत नोंदवावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. टिप : सदर हरकत ॲड. तेजस्विनी प्रशांत आडके, यांचे कार्यालयात अथवा वरील दिलेल्या इ मेल आयडीवर नोंदवावी अन्य ठिकाणी तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी. सदर जाहिर नोटीस आमच्या अशिलांमार्फत प्रसिध्द करण्यात आली आहे.

दि. २७/०१/२०२६

आमचे मार्फत प्रसिध्द / ॲड. तेजस्विनी प्रशांत आडके,
पत्ता:चेंबर नं ५, लक्ष्मीनारायण हाईटस, हरिविश्व बिल्डींग शेजारी,
एक्सप्रेस इन हॉटेल मागे, पाथर्डी फाटा, नाशिक. मो.नं. ८६६९०७१८४८

# स्वारातीम विद्यापीठात 77 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात आज सोमवार, दि.२६ जानेवारी, २०२६ रोजी भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते चंदनहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारताच्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यानंतर कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व राज्यगीताचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.पराग खडके, आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळाचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड यांच्यासह विद्यापीठातील विविध संकुलाचे संचालक, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी मागील एका वर्षात विद्यापीठात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा व शैक्षणिक, संशोधनात्मक व प्रशासकीय कार्याचा सविस्तर आढावा घेतला. विद्यापीठाची प्रतिमा उंचावण्यासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिले, त्या सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. याच कार्यक्रमात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.



ठाणे : दिव्यात प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना भाजपा काजू महामंडळ अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश रुपेश बेलोसे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र भाजपा अनुसूचित जाती मोर्चा ठाणे जिल्हा सरचिटणीस, ह्युमन राईट्स राष्ट्रीय सरचिटणीस, टायगर ग्रुप ठाणे जिल्हा अध्यक्ष मा.श्री शशिकांत (सतीश) केळशीकर यांच्या नेतृत्वाखाली दिव्यात प्रभागात वह्या वाटप करण्यात आले. प्रसंगी कोकण प्रतिष्ठान दापोली खेड मंडणगड अध्यक्ष तुषार गायकर, दिलीप शिगवण, गणेश दवंडे , तसेच साधना सिंग जी, पूनम सिंग व नरेंद्र भोईर, कैलास गोगावले, रमेश कोळी, सूरज पानसरे व सर्व सहकारी उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### समृद्धी शिंदे जिल्हास्तरावर विज्ञान प्रदर्शनात सर्वप्रथम

तामसा (स. गांवकरी) : २३ जानेवारी रोजी नांदेड येथील ग्रामीण पॉलीटेक्निक कॉलेज विष्णुपुरी या ठिकाणी पार पडलेल्या जिल्हा विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयोगासह सहभाग नोंदीला होता. पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसाची विद्यार्थिनी कुमारी समृद्धी गणेश शिंदे हिने परीक्षकांच्या प्रत्येक प्रश्नांना अतिशय समाधानकारक उत्तर दिल्यामुळे तिच्या एक्वा पोनिक फार्मिंग या प्रयोगाला माध्यमिक गटातून सर्वप्रथम क्रमांक देण्यात आला. येत्या २८ तारखेला होणाऱ्या नागपूर येथील पाच दिवशी य वीज्ञान प्रदर्शनत तिची नांदेड जिल्ह्यातून निवड झाली आहे. नांदेडचे शिक्षणाधिकारी सलगर यांच्या हस्ते तिला ट्रॉफी व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या प्रयोगासाठी तिला शाळेतील जीपी तावडे,आर के रापतवार, सविता पाटील,स्मिता ठाकूरवाड, विश्वनाथ कोलगिरे,श्रीकांत मुकनवार यांचे मार्गदर्शन लाभले. प्रजासत्ताक दिनानिमित्त आलेल्या मान्यवरांच्या हस्ते तिचा शाळेत सत्कार करण्यात आला व तिला राज्यस्तरासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ती निर्मला ठाकूर, माजी उपसभापती शंकर मेंडके, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य उपस्थित होते.

### गुरुवारी मोफत तपासणी व विविध आरोग्य शिबिराचे आयोजन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : सिटी केअर हॉस्पिटल, संजय सत्रे (नाना) सोशल फौंडेशन व आस्था आय केअर श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, भुतकरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने कै. संजय सत्रे (नाना) स्मृती प्रित्यर्थ मोफत तपासणी शिबीराचे आयोजन गुरुवार, दि.२९/०१/२०२६ वेळ : सकाळी १०.०० ते २.०० या वेळेत भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरीक संघ, ऑफिस, श्री गुरुदत्त उद्यान, पंपींग स्टेशन रोड येथे करण्यात आले आहे. या शिबिरात इ.सी.जी,रक्तदाब तपासणी, रक्तातील शुगर तपासणी,हाडांची घनता तपासणी,डोळ्यांचे नंबर व सर्व विकारांची तपासणी मोफत केली जाईल. तसेच या शिबिरात डॉ.संदिप सुराणा (अस्थिरोग तज्ञ) डॉ. चैत्राली सारडा (नेत्ररोग तज्ञ), मधुमेह व अतिदक्षता विभाग तज्ञ,डॉ.ज्ञानेश्वर फुसे, डॉ.योगिता सत्रे (होमिओपॅथिक तज्ञ)तज्ञ डॉक्टर तपासणी करणार आहे. या शिबिराचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा.असे आवाहन डॉ.रणजित सत्रे (डायरेक्टर, सिटी केअर हॉस्पिटल),स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष भिमाशंकर लांडे, उपाध्यक्ष विलास ताठे, कार्याध्यक्ष संभाजी काळे, खजिनदार विश्वनाथ जाधव, सचिव आप्पा बेंद्रे यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क, महेश मोरे-8308080254 यांच्याशी संपर्क साधावा.




### विद्यार्थ्यांनी विज्ञान, संशोधन व पर्यावरण संवर्धनाकडे वळावे : रणजित राऊत

जामखेड तालुका (स. गांवकरी) : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,फक्राबाद, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्या नगर येथे युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित रावसाहेब राऊत यांचा आंतरराष्ट्रीय परिषदेत युवा शास्त्रज्ञ पुरस्कार तसेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे भगवान महाविद्यालय आष्टी आयोजित गंगाई बाबाजी कला रौप्य महोत्सवात मिळालेल्या राज्यस्तरीय आदर्श प्राणी मित्र पुरस्कारा बद्दल फक्राबाद ग्रामस्थ व प्राथमिक शाळेच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सत्कार प्रसंगी वक्त्यांनी रणजित रावसाहेब राऊत यांच्या संशोधन कार्याचा, जैवविविधता संवर्धनातील योगदानाचा आणि पर्यावरण-जाणीव निर्माण करण्यातील भूमिकेचा विशेष उल्लेख केला. ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचलेले हे यश युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना रणजित राऊत यांनी मिळालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून विद्यार्थ्यांनी विज्ञान, संशोधन व पर्यावरण संवर्धनाकडे वळावे,असे आवाहन केले.

# अध्यक्षपदी विनोद पाटील तोरणे यांची निवड

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



शासकीय विश्रामगृह कंधार येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा 2026 ची बैठक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे माजी अध्यक्ष धनराज पाटील लुंगारे (बाळू पाटील) यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली या बैठकीत संभाजी ब्रिगेडचे माजी सचिव विनोद पाटील तोरणे यांची शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

दिनांक 26 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता शासकीय विश्रामगृह कंधार येथे शहरामध्ये दरवर्षीप्रमाणे 19 फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते ही बैठक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे माजी अध्यक्ष बाळू पाटील लुंगारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली या बैठकीत 19 फेब्रुवारी 2026 रोजी साजरा होणारा शिवजन्मोत्सव सोहळ्या विषयी विविध विषयावर चर्चा होऊन जन्मोत्सव सोहळ्याच्या अध्यक्षपदी संभाजी ब्रिगेडचे माजी जिल्हा सचिव विनोद पाटील तोरणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली व उर्वरित कार्यकारणी निवडीची बैठक दिनांक 28 जानेवारी रोजी शासकीय विश्राम वर कंधार येथे दुपारी तीन वाजता आयोजित करण्यात आलेली आहे या बैठकीला धनराज पाटील लुंगारे नामदेव कुठे बळीराम पाटील पवार नितीन पाटील कोकाटे परमेश्वर पाटील जाधव संदीप पाटील तोंड चिरे प्रदीप पाटील हुंबाड अमित पाटील मोरे विकास पाटील गारोळे शहाजी पाटील शिंदे अंकुश पाटील कदम सौरभ मोरे संतोष बोरोळे डीजी जाधव त्रिभुवन मोरे शाहरुख शेख प्रदीप पाटील हुंबाड कैलास पाटील पवळे विष्णू पाटील जाधव ज्ञानेश्वर पाटील तेलंग विकास पाटील लुंगारे यांच्यासह तालुक्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# येवती पब्लिक स्कूल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

२६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनी श्री सद्गुरू नराशाम महाराज पब्लिक स्कूल येथे ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीला ७६ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ठीक ७: ४५ वाजता शाळेचे संचालक आनंदराव भानुदास राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण फडकविण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताच्या सुरावटीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त छोटेखानी भाषणे केली तर दुसरीकडे मात्र विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये प्रथम द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना वही पेन पेन्सिल उजळणी बिस्किटे वाटत करण्यात आले . या कार्यक्रमाला गावातील ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठीत मान्यवर पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व युवावर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

# नगराध्यक्ष शहाजी नळगे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार नगर परिषदेत काल सकाळी लोकनियुक्त नगराध्यक्ष शहाजी नळगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून भारताचा ७७वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी मुख्याधिकारी संदीप भोळे यांच्यासह सर्व नगरसेवक, स्वीकृत सदस्य,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात नगर परिषद आवारातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृतीपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून लोकनियुक्त नगराध्यक्ष शहाजी नळगे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. या राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष अरविंदादा नळगे,माजी नगराध्यक्ष रामराव पवार,माजी नगराध्यक्ष दगडूभाऊ सोनकांबळे,सर्व पक्षातील पुढारी,नेते, आजी/ माजी सैनिक,पोलिस अधिकारी चंद्रकांत जाधव, न.पा.चे कुलदीप बोकारे, सर्व विभागांचे प्रमुख, अधिकारी,कर्मचारी,विविध शाळेतील विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजूर येथे मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**राजूर : (समर्थ गांवकरी)**




स्वानंद जेष्ठ नागरिक संघ राजूर, श्री. स्वामी समर्थ सेवा केंद्र राजूर व न्यायिक मानवाधिकार परिषद राजूर तसेच वेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. सचिन हिवराळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राजूर येथे शिबिर संपन्न झाले. यावेळी स्वानंद ज्येष्ठ नागरिक संघाच्य अध्यक्षा रजनी टिभे, उपाध्यक्ष रविंद्र सोनवणे, कोषाध्यक्ष निवृत्ती आभाळे सचिव पंढरीनाथ खाडगीर, सहसचिव भाऊसाहेब सोनार,सुनिल पाबळकर, लहानू परबत, माधवराव गभाले इ. सर्व सदस्य व न्यायिक मानवाधिकार परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रा. योगेश बाराथे, न्यायिक मानवाधिकार परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे संपर्क प्रमुख मच्छिंद्र ढगे, प्रा.अजय पवार , जिल्हा संपर्कप्रमुख वसंत आरोटे,माजी प्राचार्य मनोहर लेंडे, व एन.सी.सी. विभागाचे प्रमुख संजय देशमुख उपस्थित होते.नवभारत वसतिगृहातील विद्यार्थी आर्यन गायकवाड, जीवन कोरडे, विशाल मुंढे, खोकले राहुल, निखिल भांगरे, प्रकाश आसवले, भोज ऋषभ या सर्वांनी दोन दिवस शिबिरा साठी पूर्ण वेळ सहकार्य केले.

राजूर गावचे माजी सरपंच गणपत देशमुख तसेच स्वानंद जेष्ठ नागरिक संघाचे सर्व सदस्य यांसह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन केले. नंतर उद्घाटन झाल्यावर न्यायिक मानवाधिकार परिषदेचे अधिकारी पदाधिकारी,डॉक्टर यांच्या टिमचा सत्कार केला. डॉ. सचिन हिवराळे सर यांनी सर्वांना मार्गदर्शन करून सर्व 115 रुग्णांना मोफत तपासण्या करून मोफत गोळ्या औषधे दिले. बीपी,शुगर इत्यादी आजारांचे मोफत तपासण्या करण्यात आल्या.राजूर गावातील हा 25 वा कॅम्प होता. अतिशय आनंदी वातावरणा मध्ये श्री. स्वामी समर्थ सेवा केंद्र राजूर या पवित्र भूमी मध्ये हे शिबिर पार पडले. राजूर गावातील वयोवृद्ध महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक, मुले, मुली, ग्रामस्थ या सर्वांनी मोफत शिबिराचा लाभ घेतला. सुनिल पाबळकर यांनी न्यायिक मानवाधिकार परिषद व डॉक्टरांच्या टीमला चहा व नास्ता यांची खास व्यवस्था केली. अन्न दाता सूखी भव याप्रमाणे स्वानंद जेष्ठ नागरीक संघ यांनी दोन्ही टीमला उत्तम अशी भोजनाची व्यवस्था केली.

अनेक घेतलेल्या शिबिरांपैकी एक आगळवेगळे शिबिर या राजूर गावामध्ये झाले. याचे सर्व श्रेय स्वानंद जेष्ठ नागरिक संघ, श्री. स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सेवेकरी ,छात्रालयातील विद्यार्थी या सर्वांनी भरीव असे सहकार्य केले. त्यामुळे अनेक उत्तम शिबिरांपैकी हे एक उत्तम शिबीर म्हणून आदिवासी भागाचे प्रमुख केंद्र असलेल्या राजूर येथे संपन्न झाले .

तुका म्हणे एकमेका सहाय्य करु अवघे धरू सुपंथ याप्रमाणे प्रत्येकाने खारीचा वाटा उचलुन हे शिबिर यशस्वी केले. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जे आपुले साधु तोची ओळखावा देव तेथची जानावा याप्रमाणे या न्यायिक मानवाधिकार परिषदेचा अकोले तालुक्यातील मोफत शिबिर सर्व गावे, वाडी या दुर्गम भागापर्यंत घेण्याचा मानस आहे आणि तो यशस्वी करण्यासाठी एन .एम.पी व डॉ. सचिन हिवराळे हे नेहमीच प्रयत्नशील असतात. मानव सेवा हिच ईश्वर सेवा समजून आम्ही आमचे कार्य शेवटपर्यंत चालू ठेवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# देशाचा चांगला नागरिक होण्याचा प्रयत्न केला - डॉ. ओजस जोशी

## श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक, सांगळे गल्ली येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




"शालेय जीवनात विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल व गुरुजनांबद्दल नेहमी आत्मीयता बाळगावी, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमीत कमी करावा, आई-वडिलांचा आदर करावा व शाळेपासूनच देशसेवेची सुरुवात करावी, देशाचा चांगला नागरिक होण्याचा प्रयत्न करावा," असे प्रतिपादन या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. ओजस जोशी यांनी केले. श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक, सांगळे गल्ली येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी शाळेच्या प्रांगणात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. ओजस जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. समवेत शालेय समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी , सदस्य सुनील जोशी , माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कानडे , प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागाचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना स्वदेशी व स्वच्छता या मूल्यांची जोपासना करण्याचे आवाहन केले. याच माध्यमातून खरी देशसेवा घडेल, असे त्यांनी सांगितले. "भारत मातेला मातृदेवो भव:" या उक्तीप्रमाणे मातृभूमीची सेवा करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्याध्यापक सुनील कानडे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. ध्वजारोहणापूर्वी संविधान वाचन करण्यात आले. त्यानंतर ध्वजवंदन व राष्ट्रगीत घेण्यात आले. कार्यक्रमादरम्यान देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत सादर करण्यात आली. सुत्रसंचालन सौ. शारदा होशिंग यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. श्रुती कुलकर्णी यांनी करून दिला, तर आभार श्रीमती नागरगोजे यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# वाहनचालकाचा गाडीवरील ताबा सुटला

## दुर्दैवी दोघांचा मृत्यू

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

कल्याण -आहिल्यानगर राज्य मार्गावर ओतूर येथील कोळमाथा -नंदलाल लॉन्स परिसरात मंगळवार, दि. २७ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेच्या परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्त्याच्या दुरवस्थेवरून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या अपघातात वरद अमोल तांबे (वय २० वर्षे) रा..ओतूर ता. जुन्नर (पुणे) व करण पवळे (वय २८ वर्षे) रा. पिरंगुट, पुणे यांचा मृत्यू झाला. प्राप्त माहितीनुसार, चार तरुण कारमधून कल्याणच्या दिशेने प्रवास करत होते. ओतूर येथील कोळमाथा नजीक रस्त्यावर



मोठ्या प्रमाणात खड्डे असल्याने ते चुकवण्याचा प्रयत्न करत असताना वाहनचालकाचा ताबा सुटला. यावेळी कार प्रथम रस्त्याच्या कडेला असलेल्या कवठाच्या झाडावर जोरात आदळली. त्यानंतर पुढे असलेल्या कठड्याला धडक देऊन पलटी झाली.

अपघात इतका भीषण होता की कारचे अक्षरशः मोठे नुकसान झाले. वाहनातील चार तरुण गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी व ओतूर पोलिसांनी तातडीने मदत कार्य सुरू करत जखमींना रुग्णालयात हलवले. त्यापैकी एकाला ओतूर येथील तर दुसऱ्याला आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उर्वरित दोघांना ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले असता डॉक्टरांनी प्राथमिक तपासणी केली असता वरद तांबे व करण पवळे यांना मृत घोषित केले. या अपघातानंतर ओतूर परिसरात शोककळा पसरली असून मृत तरुणांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी व वाहनचालकांनी या मार्गावरील रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधले असून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

# ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील बोरिवली ग्रामपंचायतीच्या वतीने ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या प्रांगणात झालेल्या प्रमुख कार्यक्रमात परिसरातील विविध शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभातफेरीच्या माध्यमातून 'सर्वधर्मसमभाव' आणि 'संविधान मूल्यांचा सन्मान' हा सामाजिक संदेश प्रदर्शित करण्यात आला. कार्यक्रमात बोरिवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर पिंजारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तत्पूर्वी बोरिवली ग्रामपंचायत हद्दीत प्रभातफेरी आयोजित करण्यात आली होती. 'प्रजासत्ताक दिनाचा विजय असो' व 'भारतीय संविधानाचा विजय



असो' अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुले होते. विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी देशप्रेम, एकता आणि बंधुत्व यांवरील आशयपूर्ण पोस्टरच्या माध्यमातून सामाजिक संदेश दिला.

कार्यक्रमानंतर बोरिवली ग्रामपंचायतीतर्फे उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य, माजी सदस्य, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, पोलिस कर्मचारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सदर कार्यक्रम ग्रामपंचायतीचे पंचायत अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अँड. जियाद सोहराब गुजर तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राजगुरुनगर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी नवीन स्विपिंग गाडी समाविष्ट

■ लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते उद्घाटन

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राजगुरुनगर नगरपरिषदेत प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष मा. मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादासजी गरकळ, तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने राजगुरुनगर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी शहरातील



रस्त्यांची स्वच्छता अधिक प्रभावीपणे करण्यासाठी नवीन स्वीपिंग (साफसफाई) गाडीचे उद्घाटन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व सर्व नवनियुक्त नगरसेवकांच्या हस्ते करण्यात आले. या आधुनिक स्वीपिंग गाडीमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांची स्वच्छता अधिक वेगाने व नियमित होणार असून स्वच्छ शहराच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे.

तसेच नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत प्राईड सिटी वाडा रोड व तिन्हेवाडी रोड, तांबे वस्ती परिसरात उभारण्यात आलेल्या नवीन पाण्याच्या टाक्यांच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वॉलमन रूमचे उद्घाटन करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांचे नियोजन नगरपरिषदेच्या आरोग्य विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी आनंदाची भावना व्यक्त करत, कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी कर्मचाऱ्यांच्या वतीने नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व आभार मानण्यात आले.

# लेख स्पर्धा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मराठी भाषेचा पूर्वेतिहास अभिमान वाटावा इतका रोचक आहे. संपन्न आहे. वैभवपूर्ण आहे. भविष्यात मात्र मराठी भाषा महाराष्ट्रातून लोप पावेल की काय, अशी आजची अवस्था निर्माण झाली आहे. वैभवशाली मराठी भाषेचा पूर्वेतिहास पाहिल्यास इतकी का आपली भाषा समृद्ध होती असे आजच्या तरुण पिढीला वाटण्याची शक्यता आहे. मराठी शाळांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शिक्षण आणि व्यवहारातील हिंग्लिश मिंग्लिशच्या वाढत्या आक्रमणाला जबाबदार कोण? वैभवशाली मराठी भाषेला क्षीण करणारे दगाबाज कोण? (बाजारू शिक्षणव्यवस्था, पालकांची महत्वाकांक्षा की बदलत्या जगाचा व्यवहार) या विषयावर मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत कामगार नेते वसंतराव होशिंग स्मृती लेख स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

# "भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज रहा" – कर्नल सुबीर चंद चिब्बर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर येथील तपोवन रोडवरील ज्ञानसंपदा विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आरमड कॉर्पचे कर्नल सुबीर चंद चिब्बर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाली. संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, स्कूल कमिटी चेअरमन कारभारी भिंगारे, विश्वस्त श्रीहरी टिपूगडे, सुमित सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे कर्नल सुबीर चंद चिब्बर यांनी आपल्या मनोगतात सैन्य दलातील अनुभव सांगत विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज राहण्याचे आवाहन केले. शालेय शिस्त, धैर्य व देशसेवेचे



महत्त्व अधोरेखित करत शालेय विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी ज्ञानसंपदा शाळेत एनसीसी हा नवीन शैक्षणिक उपक्रम सुरू करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी कुष्ठरोग जनजागृतीविषयी माहिती देण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज यांनी शाळेच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत क्रीडा क्षेत्रातील राज्यस्तरीय निवड, शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षक प्रशिक्षण,व्याख्यानमाला, माजी विद्यार्थी संघ व विविध स्पर्धा परीक्षां आदी विषयाचा चढता आलेख ठेवण्यासाठी व्यवस्थापक मंडळ, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

राष्ट्रगीत, झेंडागीत व महाराष्ट्र गीताचे गायन करण्यात आले. इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन सादर करून शिस्त व एकात्मतेचा संदेश दिला.प्रमुख पाहुण्यांचा परिचय शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर यांनी करून दिला. यावेळी कर्नल चिब्बर यांचा सत्कार करण्यात आला. शालेय वाद्यवृंद व गायकवृंदाने सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून टाकले.

पूर्वप्राथमिक विभागातील चिमुकल्यांच्या नृत्य सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी हिंदी व इंग्रजी भाषणांमधून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. कराटे स्वसंरक्षण प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांनी आत्मसंरक्षणाचे धडे दिले. त्यानंतर सामूहिक कवायत (मास ड्रिल) सादर करण्यात आली.याप्रसंगी 'ज्ञान टाईम्स' या शालेय नियतकालिकाच्या द्वितीय आवृत्तीचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

# नगर -दौंड डबल लाईन रेल्वे मार्ग प्रकल्पा अंतर्गत दौंडकाष्टी सिंगल लाईनचा अडसर संपणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर -दौंड डबल लाईन रेल्वेमार्ग प्रकल्पातंर्गत दौंडकाष्टी १३ कि.मी. अंतराची चाचणी रविवारी (दि.२५) रोजी घेण्यात आली लवकरच नगर ते दौड पर्यंतचे हे काम पूर्ण होणार असून यामुळे नगरचा रेल्वे प्रवास सुपरफास्ट होणार आहे. या पूर्ण मार्गात इलेक्ट्रिक इंजीनचा वापर होत आहे. गेल्या तीन वर्षापासून नगर ते दौड द्रुतगती (डबललाईन) रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. या पुर्वी नगर ते मनमाड १२ टप्पाची चाचणी घेण्यात आली. नगर ते मनमाड मधील १८४ कि .मी. डबल लाईन रेल्वे मार्गाची चाचणी घेण्यात आली. मनमाड ते दौंड रेल्वे मार्गात नगरच्या रेल्वे स्थानकाचा महत्त्वपूर्ण टप्पा येतो. मात्र हा मार्ग सिंगल लाईन



असल्यामुळे रेल्वेगाडी चा वेग कमी होता. तसेच सिंगल लाईन मुळे अनेकदा रेल्वेगाड्यांना थांबा घ्यावा लागत होता. त्यामुळे तासोनतास रेल्वे गाडी एकाच जाग्यावर थांबुन ठेवावी लागत. मात्र आता हा पूर्ण मार्ग डबल लाईन करण्यात येत असल्यामुळे विनाकारण रेल्वेगाडयांचा थांबा आता बंद होणार आहे. तसेच या कामामुळे रेल्वे ताशी १२० प्रति किमी वेगाने धावणार असल्याने रेल्वेगाडी धावण्याचा वेगही सुपरफास्ट होणार आहे. तीन वर्षापासून हे काम सुरू आहे.

पहिल्या टप्प्यात नगर ते मनमाड व दुसऱ्या टप्प्यात नगर ते दौंड पर्यंत काम पूर्ण होणार आहे. रविवारी झालेल्या चाचणीत या द्रुतगती मार्गाचा नेमका वेग काढण्यात आला. नगर ते दौड पर्यतंचा टप्पा पूर्ण होण्यास अजून काही कालावधी लागू शकतो असा अंदाज उप मुख्य अभियंता सागर चौधरी (बांधकाम) यांनी सांगितले.

या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दौंड ते काष्टी द्रुतगती लोहमार्गाच्या चाचणीसाठी घेतली. रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा, मुख्य प्रशासकीय अधिकारी ए. के.पांडे, मुख्य अभियंता बी. के. सिंह, उपमुख्य अभियंता सागर चौधरी,(बांधकाम),सहाय्यक कार्यकारी अभियंता राजनारायण सैनी, सिनियर सेक्शन इंजिनिअर प्रशांत कुमार, सिनियर सेक्शन इंजिनिअर अजय राणा, धर्मेंद्र कुमार, एस. के. सिंह, सुद्धांसू कुमार, आर. डी. सिंह, प्रगती पटेल, परशुराम राठौड़, धम्मरत्न संसारे आदी उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुमशेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर वेषभूषा सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष महत्व प्राप्त झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात, देशभक्ती गीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढत परिसर दुमदुमवून टाकला. "भारत माता की जय", "वंदे मातरम्", "जय हिंद", जय जवान जय किसान ..... अशा घोषणांनी संपूर्ण गाव देशप्रेमाच्या रंगात न्हाऊन निघाले. ग्रामपंचायत कुमशेत येथे भारतीय नवजवान सैनिक मेजर अक्षय डोके यांच्या हस्ते ध्वजारोहण व पूजा विधि अध्यक्ष अशितोष डोके, महिला भगिनी यांच्या हस्ते पार पडला.

# अहिल्यानगर वनविभाग झाला हायटेक ! बिबट्यांच्या रेस्क्यूसाठी ८ कोटींची अत्याधुनिक सामग्री

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील बिबट्यांचा वावर व त्यातून होणारा मानवी संघर्ष रोखण्यासाठी वनविभाग आता पूर्णपणे सज्ज झाला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून वनविभागाला सुमारे ८ कोटी २६ लाख रुपये किमतीची अत्याधुनिक (हायटेक) रेस्क्यू सामग्री देण्यात आली आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आज या नवीन साहित्याचे लोकार्पण करण्यात आले. सध्या बिबट्या किंवा इतर वन्यप्राण्यांच्या बचावकार्यासाठी वनविभागाकडे 'अँडव्हान्स' टेक्नॉलॉजी आली आहे. यामध्ये अत्याधुनिक रेस्क्यू वाहने, अंधारात पाहता येणारे गॉगल्स (नाईट व्हिजन), थर्मल ड्रोन, डार्ट गन व ट्रॅप कॅमेरे यांचा समावेश आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी खास जॅकेट्स, जंगलात वापरण्याचे बूट आणि फायबरच्या



ढालीही देण्यात आल्या आहेत. याप्रसंगी पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, ऊस पट्ट्यात बिबट्यांचा वाढता वावर ही चिंतेची बाब आहे. संघर्षात नुकसान झालेल्यांना शासनाने आतापर्यंत पावणेसात कोटींची मदत दिली आहेच; पण केवळ नुकसान भरपाई देऊन चालणार नाही. हा संघर्ष टाळण्यासाठी वनविभाग सक्षम होणे गरजेचे होते. आज मिळालेल्या या आधुनिक साधनांमुळे वनविभागाची ताकद वाढली असून, आपत्ती काळात ते अधिक वेगाने काम करू शकतील. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्र्यांनी स्वतः या साहित्याची पाहणी करून त्यांच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली.

# बुरुडगावात सीना नदीवरील 'राम सेतू पूल' व 'राम झुला'चे लोकार्पण

## सार्वजनिक स्वच्छता व विकासासाठी लोकसहभाग महत्त्वाचा - आमदार जगताप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगरपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बुरुडगाव येथे सीना नदीवरील दोन ठिकाणच्या पुलांचे सुशोभीकरण करून साकारलेल्या 'राम सेतू पूल' व 'राम झुला' चे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडले. सामाजिक कार्यकर्ते संकेत कुलट यांनी स्वखर्चातून हे काम पूर्ण गावाच्या विकासाला व सुशोभीकरणाला चालना दिली आहे.

या उद्घाटनप्रसंगी माजी महापौर भगवान फुलसौंदर, नवनिर्वाचित नगरसेवक गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, अमोल येवले, मयूर (बाली) बांगरे, सुमित लोंढे, संजय चोपडा, जालिंदर कोतकर, अवधूत फुलसौंदर, संकेत कुलट, सुभाष कुलट, विवेक (मुन्ना) कुलट आदींसह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

प्रारंभी फटाक्यांच्या आतषबाजीत आमदार जगताप यांच्यासह पाहुण्यांचे गावात स्वागत करुन महिलांनी औक्षण केले. यावेळी राम सेतू पूलावर माझं गाव माझा अभिमान या फलकाचे अनावरण करण्यात आले.

प्रास्ताविकात जालिंदर कुलट यांनी सांगितले की, संकेत कुलट यांनी स्वखर्चाने सीना नदी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण केल्यामुळे यंदा मोठ्या प्रमाणावर पाऊस होऊनही गावाला पुराचा फटका बसला नाही. याशिवाय त्यांनी ७०० विद्यार्थ्यांना सायकल वाटप, अमरधाम विकास, विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत. भिंगारनाला ते बुरुडगाव रस्त्याचे काम मार्गी लावण्याची मागणीही यावेळी आमदार जगताप यांच्याकडे त्यांनी केली.

संकेत कुलट यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करताना सांगितले की, आमदार संग्राम जगताप हे सर्वसामान्यांसाठी काम करणारे नेतृत्व आहे. ते जो निर्णय घेतील, त्यांच्या पाठीशी कार्यकर्ते आणि बुरुडगाव एकमुखाने उभा राहणार असल्याचे स्पष्ट केले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, बुरुडगावात झालेल्या राम सेतू पूल व राम झुलाचे सुशोभीकरण गावाच्या विकासाला चालना देणारे आहे. विकासात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. राष्ट्र संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेसाठी मोठे कार्य केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान दिले, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. या कार्यात महापुरुषांची सातत्य ठेवले. स्व. आर.आर. पाटील यांनी ग्रामविकास मंत्री असताना गावे हागणदारी मुक्ती होण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले.

अलीकडच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेसाठी स्वतःहातात झाडू घेऊन नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगत आहे. इंदोर शहर




स्वच्छतेच्या बाबत देशात पहिल्या क्रमांकावर आहे. यामध्ये तेथील नागरिकांचे महत्त्वाचे योगदान आहे. लोकांनी ठरविले तर गाव आणि शहर स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही. बुरुडगावचा विकास साधला जात असताना पुढची जबाबदारी ग्रामस्थांची आहे. शहर कचरा मुक्त होण्यासाठी नागरिकांचा संकल्प घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

शहरात डांबरी रस्ते पावसामुळे जास्त काळ टिकत नव्हते, म्हणून मोठ्या प्रमाणात निधी आणून सिमेंटचे रस्ते केले जात आहे. शहराच्या इतिहासात एवढा निधी यापूर्वी आला नाही. सामाजिक कामाला विरोध होत असते, मात्र न थांबता पुढे जायचे असते. समाजाचा विरोध पत्करून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी क्रांती घडवली. विकास व हिंदुत्व या मुद्द्यांवर महापालिका निवडणुकीत यश मिळाल्याचे आमदार जगताप यांनी स्पष्ट केले.

गणेश भोसले म्हणाले की, युवकांच्या पुढाकाराने गावाचा कायापालट होत आहे. सोशल मीडियावर बुरुडगाव परिसरातील रिल्स आणि फोटोशूट मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. कुलट यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून इच्छाशक्ती असेल तर विकास साधता येतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी कुलट यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करताना सांगितले की, बुरुडगावच्या प्रत्येक विकासकामात त्यांचे योगदान आहे. आमदार संग्राम जगताप यांनी शहरात कोट्यवधींचा निधी आणून रस्ते कॉंक्रिटीकरण, ३० कोटींचे रुग्णालय उभारले. हिंदुत्वाचा वारसा पुढे नेत जगताप कार्यरत असून लवकरच ते कॅबिनेट मंत्री होतील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. प्रकाश भागानगरे म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून नगर शहराचा चेहरामोहरा बदलताना दिसत आहे. विकास आणि धर्मकार्याला गती मिळाली असून विकास व धर्माच्या रथाचे सारथी आमदार जगताप असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# आरोग्य सुविधा बळकट करणे हीच खरी लोकसेवा : आ. जितेश अंतापुरकर

## केरुर येथील नव्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे प्रजासत्ताक दिनी लोकार्पण

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील केरुर येथे महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत बांधण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नव्या इमारतीचा लोकार्पण सोहळा देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश भाऊ अंतापुरकर यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मोठ्या उत्साहात पार पडला.

पंधराव्या वित्त आयोगांतर्गत उभारण्यात आलेले हे आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र केरुर व परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य सुविधांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या उपकेंद्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी केरुरच्या सरपंच सौ. दैवशिला बालाजी कुरणापल्ले यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यासाठी त्यांना आमदार जितेश अंतापुरकर यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले.

लोकार्पण सोहळ्यात बोलताना आमदार अंतापुरकर म्हणाले,

"ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, यासाठी शासनस्तरावर तसेच स्थानिक पातळीवर पायाभूत सुविधा सक्षम करणे अत्यावश्यक आहे. आरोग्य सुविधा बळकट करणे हीच खरी लोकसेवा आहे."

विशेष बाब म्हणजे, सदरील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास आमदार अंतापुरकर यांनी निधीतून भरीव निधी उपलब्ध करून संरक्षण भिंतीस दिली, त्यामुळे उपकेंद्राची सुरक्षितता अधिक भक्कम होणार आहे.

या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य माणिकराव लोहगाव, भाजप पश्चिम मंडळाचे तालुका अध्यक्ष मारुती राहिरे, भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष




ब्रह्मा कांबळे,किनाळाचे सरपंच विठ्ठल माने,चिटमोगरा सरपंच आकाश कोकणे,हिप्परगामाळचे सरपंच तिरुपती डाकोरे, केरुरचे सरपंच सौ. दैवशिला कुरणापल्ले, बालाजी कुरणापल्ले, दिगांबर हजारे, रवि चिमनापूरे यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्या आरोग्य उपकेंद्रामुळे केरुर व परिसरातील ग्रामीण नागरिकांना तात्काळ आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार असून, आरोग्य व्यवस्थेला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शिबिरातून संस्काराची शिदोरी घेऊन जावी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर. व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिर कर्जुले हरिया येथे पार पडली. या शिबिराच्या समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिबिरातून संस्काराचे शिदोरी घेऊन जावी, संतांनी दिलेल्या मार्गदर्शन तत्त्वावर वाटचाल करून आपले जीवन यशस्वी करावे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री दीपक जीदरे यांनी व्यक्त केले.

विशेष हिवाळी संस्कार शिबिर दिनांक १७ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. शिबिरादरम्यान योगा, प्रार्थना, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, तसेच सामाजिक प्रबोधनात्मक उपक्रम राबवण्यात आले, विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने विविध विकासात्मक कामामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी होते. यावेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रभावी चळवळ असून, समाजाशी नाते जोडण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. तसेच शिबिरातून विद्यार्थ्यांनी ऊर्जा घेऊन जावे व जीवन समृद्ध करावे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी या शिबिरास ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच शिबिरातून विद्यार्थ्यांनी स्वयं शिस्तीचे धडे घेऊन जावेत असे मत व्यक्त केले.

यावेळी हरेश्वर देवस्थानचे अध्यक्ष श्री शिवाजीराव शिर्के, सचिव एकनाथ दाते, श्री हरेश्वर विद्यालय, कर्जुले हर्या, मुख्याध्यापक श्री मधुकर बर्वे यांनीही मनोगत व्यक्त केली. याप्रसंगी विविध उपक्रमात उत्कृष्ट काम केलेल्या विद्यार्थी समूहास सन्मानित करण्यात आले.

# कोंबड्या व शेळ्या उचलणारा जिल्हा परिषद सदस्य नको

**प्रा. संजय साबळे**

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**



आदिवासी दुर्गम तांबे - पाडळी जिल्हा परिषद गटामध्ये कोंबड्या व शेळ्या उचलणारा जिल्हा परिषद सदस्य नको . आम्ही कोणत्या पक्षाचे नाही , पण आम्ही आदिवासी विकासाच्या बाजुने आहे . असे प्रसार माध्यमांशी बोलताना प्राध्यापक संजय साबळे यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी सरपंच दत्ता गवारी , माजी उपसरपंच अजिंक्य घोलप , ॲड. ललित जोशी , चेअरमन काळू शेळकंदे , आदिवासी नेते मारुती वायाळ, किरण लोहकरे ,उपसरपंच गंगाराम सांगडे , सुरेखा जठार , अशोक बोचरे , ह भ प पोपट खंडागळे , ह भ प देवदत्त निकम , नगरसेविका अलका फुलपगार , सरपंच देवका मोरे , सरपंच , उपसरपंच ,पोलीस पाटील उपस्थित होते. प्रा. साबळे पुढे म्हणाले की , येथील आदिवासी जनतेसाठी दुग्ध व्यवसाय , रोजगार व इतर प्रश्न सोडविणारा जिल्हा परिषद सदस्य पाहिजे आहे. हिरडा आमचा उत्पादन साधन आहे . याबाबत येथील जिल्हा परिषद सदस्यांनी ब्र शब्द कधी काढला नाही . माणिकडोह धरणाच्या वरच्या व खालच्या भागात बंधारे बांधले तर शेती सुजलम सुफलाम होईल पण याबाबत नियोजन व आराखडा नाही.

जल जीवन पाणी योजनेबाबत या आदिवासी भागात बट्ट्याबोळ झाला आहे . रोजगार हमी कायदा बाबत कधीही निर्णय घेतला नाही. यामुळे रोजगार निर्मितीमध्ये हा परिसर वंचित राहिला आहे .

येथील जिल्हा परिषद गटातील उमेदवारांनी या भागाचा कामाचा आराखडा सांगायला पाहिजे होता . जिल्हा परिषद निधी बाबत पूर्ण माहिती नाही. यामुळे हा भाग आदिवासी , खडकाळ व पाणीटंचाईग्रस्त राहिलेला आहे .



# जगन डोके यांचे निधन

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुमशेत येथील श्री शिवछत्रपती गणेशोत्सव मंडळ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील मंडळाचे आधारस्तंभ व माजी ग्रामपंचायत सदस्य जगन देवराम डोके वय वर्ष ५४ यांचे निधन झाले आहे. यांच्या पाठीमागे पत्नी दोन मुल , मुलगी ,जावई, भावजय , पुतणे , सुना व चुलते असा मोठा परिवार आहे.

# शब्दगंध परिवाराच्या सत्काराने भारावलो : संपतदादा बारस्कर

## शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने सत्कार समारंभ



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शब्दगंधच्या माध्यमातून नवोदित लेखक कवींना संधी मिळत आहे, साहित्यिक कार्यक्रमाचे सातत्य त्यांनी राखले असून आम्हालाही त्यापासून प्रेरणा मिळत आहे, शब्दगंध हा एक परिवार असून या परिवाराने सत्कार केल्याने मी भारावून गेलो आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपतदादा बारस्कर यांनी केले.

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

यावेळी शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, ज्ञानदेव पांडुळे, प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे, संस्थापक सुनील गोसावी, राजेंद्र चोभें,डॉ. अनिल गर्जे, भारत गाडेकर, प्रा. डॉ. अशोक कानडे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सोळाव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मोठ्या मताधिक्याने निवडून आल्याबद्दल संपतदादा बारस्कर यांचा शब्दगंध च्या वतीने अध्यक्ष राजेंद्र उदागे व ज्ञानदेव पांडुळे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना संपतदादा बारस्कर म्हणाले की, आमच्या प्रभागातील सर्वच नागरिकांनी आमच्यावर प्रेमाचा मतरूपाने वर्षाव केला असून उतराई होण्यासाठी परिसरातील नागरिकांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल,अहिल्यानगर शहर आमदार संग्रामभैया जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वोत्कृष्ट होण्यासाठी प्रयत्न केले जातील.

शब्दगंध च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमास सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील गोसावी यांनी केले तर राजेंद्र चोभे पाटील, बबनराव गिरी व ज्ञानदेव पांडुळे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी शब्दगंध चे पदाधिकारी

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुमशेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर वेषभूषा सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष महत्व प्राप्त झाले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात , देशभक्ती गीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण केले .

विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढत परिसर दुमदुमवून टाकला. "भारत माता की जय", "वंदे मातरम्", "जय हिंद" , जय जवान जय किसान ..... अशा घोषणांनी संपूर्ण गाव देशप्रेमाच्या रंगात न्हाऊन निघाले.

ग्रामपंचायत कुमशेत येथे भारतीय नवजवान सैनिक मेजर अक्षय डोके यांच्या हस्ते ध्वजारोहण व पूजा विधि अध्यक्ष अशितोष डोके , महिला भगिनी यांच्या हस्ते पार पडला .



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे ध्वजारोहण मुख्याध्यापक यशवंत घोडे , पूजा विधि किरण डोके यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक कवायतीने शिस्त, एकात्मता आणि राष्ट्रभक्ती यांचे सुंदर दर्शन या सादरीकरणातून घडले.

कार्यक्रमात लोकशाहीचे महत्त्व, मतदानाचा अधिकार आणि जबाबदार नागरिक होण्याचे कर्तव्य यावर विद्यार्थ्यांनी विचार मांडले. सर्व विद्यार्थ्यांनी मतदान प्रतिज्ञा घेत नागरिक कर्तव्यांची जाणीव करून दिली.

विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर वेषभूषा सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. भारत मातेच्या रूपात हिंदवी डोके, राजमाता जिजाऊंच्या भूमिकेत सहयाद्री डोके, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेषात अविरत डोके विशेष लक्षवेधी ठरले.

याशिवाय स्वराज डोके, स्वरूप डोके,साईराज नाईकवाडी,,अविरत डोके, सहयाद्री डोके, आरोही भगत, नयन डोके, स्वरा डोके आणि श्रुती डोके, ओवी डोके, पर्णवी डोके, अथर्व डोके, मानसी वाणी, रिया दुधाळ,यांनी विविध सादरीकरणांतून कार्यक्रमात उत्साह वाढवला.

# पिंपळगाव जोगा कालव्याला ठिकठिकाणी गळती

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुकडी प्रकल्पातील पिंपळगाव जोगा धरणावर असलेल्या डाव्या कालव्यामधून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे . कालव्याच्या कडेला असलेल्या जमिनीमध्ये पाणी साचत असल्याने त्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे . त्यामुळे कालव्याचे लवकरच लवकर दुरुस्ती करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे . जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणावर असलेला कुकडी डावा कालवा हा पुणे व अहिल्यानगर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारा महत्त्वाचा कालवा आहे. या कालव्याला जवळपास १५ ते १६ वर्षे पासून ठीक ठिकाणी भेगा पडल्या आहेत.

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

प्रवरा माध्यमिक विद्यालय भुतेटाकळी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी स्कूल कमिटीचे अध्यक्ष कुमारभाऊ फुंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. स्कूल कमिटीचे, शालेय व्यवस्थापन समितीचे, सखी सावित्री समितीचे, माता पालक संघाचे, शिक्षक पालक संघाचे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष उपाध्यक्ष आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने झाली. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर कवायतीचे सादरीकरण केले. विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतांवर लेझीम नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांची भाषणे झाली. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा मधील बक्षिसे वितरित करण्यात आली. माजी



विद्यार्थी संघ तसेच पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वर्गणीतून विद्यालयास बांधण्यात आलेल्यावॉल कंपाऊंड च्या गेटचे रिबीन फीत कापून सर्व ग्रामस्थ पालक आणि माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

मुख्याध्यापक श्री पठाण आसिफ यांनी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ पालक, विविध समितीचे सदस्य यांनी कंपाउंड वॉल साठी केलेल्या भरीव मदतीबद्दल आभार मानले.व विद्यालयाच्या विकासकामे सर्वांनी असेच प्रेम आणि सहकार्य ठेवल्याबद्दल आभार मानून आवाहन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे ग्राउंड स्वतःहून सपाटीकरण करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. प्रास्ताविक फुंदे बाळासाहेब यांनी तर सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी केले. आभार टाकळकर आजिनाथ यांनी मानले. कार्यक्रमाचे छायाचित्रण भगत अशोक, बंडोपंत गोडगे आणि खुडे लक्ष्मण यांनी केले. याप्रसंगी खेडकर अशोक, फुंदे वाल्मिक, फुंदे रामकिसन उपस्थित होते. ग्रामपंचायत, विविध पालकांकडून उपलब्ध झालेल्या खाऊचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

# ७७वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

**(समर्थ गांवकरी)**

श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर या विद्यालयात, भारत देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयात अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे जेष्ठ विश्वस्त आदरणीय सिताराम खिलारी उर्फ अण्णा यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आदरणीय अण्णांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी स्कूल कमिटीचे सदस्य माजी चेअरमन श्री. बबनराव पायमोडे सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. लहूशेठ जाधव, उपाध्यक्ष श्री.अविनाश भालके, सदस्य व पत्रकार श्री. विनोद गायकवाड, ह.भ.प. प्रसाद महाराज खिलारी, विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षिका श्रीम. मनिषा गाडगे, कला समन्वयक श्री. विजय सोबले, शास्त्र समन्वयक श्री अशोक गांगड विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायतीचे संचालन करण्यात आले.

यानंतर प्रभात फेरी, भारत मातेचा जयजयकार करत गावात गेली व तेथे ध्वजारोहण सरपंच सौ. अरुणाताई खिलारी यांच्या शुभहस्ते झाले. ध्वजारोहणानंतर सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. प्रत्येक शाळेतील दोन सांस्कृतिक कार्यक्रमांना संधी देण्यात आली. उपस्थितांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्तपणे साथ देऊन, बक्षीसे दिली.

# टाकळी ढोकेश्वर येथील पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**टाकळी ढोकेश्वर: (समर्थ गांवकरी)**

टाकळी ढोकेश्वर येथील पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती श्वेता मुन्नारवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी एनसीसी कॅडेट, स्काउट-गाइड तसेच अरावली, निलगिरी, शिवालिक व उदयगिरी या सदनांच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ध्वजास मानवंदना दिली. ध्वजारोहणानंतर देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण विद्यालय परिसर देशभक्तीच्या



वातावरणाने भारावून गेला. कार्यक्रमात अभिजीत कोंढार (मराठी), भक्ती लोंढे (हिंदी), कु. प्रार्थना दोडके (इंग्रजी) व कु. आरोही केंगार (जर्मन) या विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व आपल्या भाषणातून प्रभावीपणे मांडले. मराठी विषयाचे शिक्षक श्री राजाराम फंड यांनी प्रजासत्ताक भारताचा इतिहास, भारतीय संविधानाची निर्मिती व त्यातील मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या प्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती श्वेता मुन्नारवार यांच्या हस्ते एनसीसी, स्काउट-गाइड, क्रीडा, विज्ञान तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांत विशेष प्रावीण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला. प्राचार्या श्रीमती श्वेता मुन्नारवार यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये आत्मसात करून शिस्त, देशप्रेम व जबाबदार नागरिकत्व जोपासण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी उपप्राचार्य कार्यालय अधीक्षक तसेच माज़ी विद्यार्थी, इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी कु. श्रद्धा दुर्गुडे व कु. पलक साहू यांनी केले. मिष्ठान्न वितरणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# वाळू तस्कराकडून पारनेर मध्ये महसूल कर्मचाऱ्यांच्या अंगावर डंपर घालण्याचा प्रयत्न

## देसवडे शिवारात मध्यरात्री धक्कादायक घटना; पथकातील कर्मचारी ४ किमी अंतरावर सापडला

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील देसवडे गावच्या शिवारात अवैध वाळू उत्खनन आणि चोरटी वाहतुकीविरुद्ध कारवाई करणाऱ्या सरकारी पथकावर एका वाळू तस्कर आरोपीने चक्क डंपर अंगावर घालून जिवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणात पारनेर पोलिस ठाण्यात विशाल बाबाजी तळेकर (रा. वासुंदे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत पथकातील एका कर्मचाऱ्याला अपहरण करून त्याचा मोबाइल फोडण्यात आला असून, पर्यावरणाचा ऱ्हास होईल अशा पद्धतीने वाळू उत्खनन केल्याचा आरोपही आहे.

घटनेच्या माहितीनुसार, अशोक भाऊसाहेब डोळस (वय ५७, मंडळ अधिकारी, पळशी) हे पारनेर महसूल विभागात गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत आहेत. महसूल विभागाने अवैध गौण खनिज उत्खनन आणि चोरटी वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी तहसीलदारांच्या आदेशानुसार जानेवारी महिन्यात पथक नेमण्यात आले आहे. या पथकात डोळस यांच्यासह एस. आर. काळे (ग्राम महसूल अधिकारी, लोणी हवेली), आर. आर. खरमाळे (रांधा), ए. डी. जगताप (चांभूत), एस. सी. पवार (सिद्धेश्वरवाडी) आणि एन. के. पवार (पळशी) यांचा समावेश होता. हे पथक २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०:३० वाजता पारनेर तहसील कार्यालयातून निघाले आणि देसवडे गावच्या भागात पेट्रोलिंग करत होते.

रात्री ११:४५ वाजता देसवडे शिवारातील मुळा नदीपात्राजवळ खंडोबा मंदिराच्या लगत एक पांढरा रंगाचा नंबर प्लेट नसलेला डंपर वाळूने भरलेला आढळला. पथक जवळ येताच दोन व्यक्ती झाडीत पळून गेल्या. त्यानंतर एक पांढरी क्रेटा कार (एमएच १४ जीएच ९२७७) तेथे आली. त्यातून उतरलेला व्यक्ती विशाल तळेकर असल्याचे डोळस यांनी ओळखले. डंपर वॉशिंग पॉइंटवर असल्याने हे अवैध उत्खनन असल्याची खात्री पटली. पथकाने पंचनामा करून वाहने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता, तळेकरने सरकारी कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केली आणि माझी वाहने नेऊ नका असे म्हणून अडथळा निर्माण केला.

पोलिस मदत बोलावल्याचे सांगताच तळेकरने डंपर सुरू केला. पथकातील संकेत चंद्रकांत पवार हे डंपर थांबवण्यासाठी क्लिनर सीटवर बसले. याचा राग येऊन तळेकरने तुम्ही माझ्या गाडीत माणूस बसवला म्हणून मी पळू शकणार नाही? थांबा, मी तुम्हा एकेकाला गाडीखाली चिरडून मारतो अशी धमकी दिली. पथकातील सदस्य डंपरसमोर उभे असतानाही त्याने जोरात डंपर चालवून अंगावर घालण्याचा प्रयत्न केला आणि पवार यांना घेऊन निघून गेला.

पथकाने पवार यांचा शोध घेतला असता, घटनास्थळापासून ४ किलोमीटर अंतरावर पोखरी गावच्या शिवारात ते रस्त्यावर सापडले. पवार यांनी सांगितले की, तळेकरने त्यांचा मोबाइल रस्त्यावर आपटून फोडला आणि वाळू रस्त्यावर टाकून धमकावून खाली उतरवले. पथक परत घटनास्थळी आले असता क्रेटा कार तेथे उभी होती. त्याचा पंचनामा करून ती ताब्यात घेण्यात आली.

डोळस यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, तळेकरने पर्यावरणाला हानी पोहोचेल असे नदीपात्रातील वाळू उत्खनन करून चोरटी वाहतूक केली. सरकारी कामात अडथळा, शिवीगाळ, धक्काबुक्की, हल्ला आणि अपहरणासारखे गंभीर आरोप आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे. या घटनेमुळे महसूल विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अवैध वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी अधिक कडक कारवाईची मागणी होत आहे.



अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या माफियांनी सरकारी पथकावर डंपर घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला, ही धक्कादायक घटना आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि सरकारी कर्मचाऱ्यांची सुरक्षा यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. अशा गुन्हेगारांना कायद्याचा दरारा निर्माण झाला पाहिजे.

# ठाण्यातील कै. निर्मलादेवी चिंतामण दिघे आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप



ठाणे : (समर्थ गांवकरी)

७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून कै. निर्मलादेवी चिंतामण दिघे आश्रम शाळा येथे लहान विद्यार्थ्यांना खाऊ वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. सकाळी ८.३० वाजता झालेल्या या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून आले. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना फ्रुटी, बेल बॉण्ड, ब्रिटानिया बिस्किटे व बालाजी वेफर्स यांचे वाटप करण्यात आले. समाजात सेवाभाव आणि सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, तसेच लहान वयातच देशभक्तीचे संस्कार रुजावेत, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सदर खाऊ वाटप कार्यक्रमाचे आयोजन दिनेश बुचुडे, दीपक तेली, संजय गुप्ता, विनय प्रजापती व विशाल कुरकुटे यांच्या वतीने करण्यात आले. शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी आयोजकांच्या या समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले.

# कार्यालयात राष्ट्रध्वजास मानवंदना

शिर्डी: (समर्थ गांवकरी)

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शिर्डी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) माणिक आहेर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार मनोज भोसेकर, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, सहायक महसूल अधिकारी संतोष धोंगडे, सहायक महसूल अधिकारी शुक्लेश्वर ईजगे, ग्राम महसूल अधिकारी भाऊ पाटील जाधव, महसूल सहायक सूर्यकांत खोजे यांच्यासह महसूल विभागाचे इतर कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# दिव्यात मुंब्रा पोलिसांकडून २४ किलो गांजासह ३ आरोपी अटकेत

ठाणे : (समर्थ गांवकरी)

मुंब्रा पोलीस स्टेशन, अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना अंमली पदार्थ विरोधी प्रभावी कारवाई करण्याच्या मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार असे मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीतील दिव्यातील मुंब्रादेवी कॉलनी परिसरात अंमली पदार्थ विरोधी गस्त करीत असताना पोहवा/६४५५ तुषार महाले यांना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या अनुषंगाने दिनांक २४/०१/२०२६ रोजी दिवा पुर्व, मुंब्रा ता.जि. ठाणे या परिसरात छापा कारवाई दरम्यान अंमली पदार्थ खरेदी/विकी करणारे आंतरराज्य टोळीत सकिय असलेले इसम नामे १) गुड्डु गोविंदकुमार हलदार, वय २७ वर्षे, २) व्यंकटेश शिव पिरमर, वय ३५ वर्षे, ३) श्रीमती रूबीदेवी मुन्शी केवट, वय ३८ वर्षे, सर्व दिवा पुर्व, मुंब्रा ता.जि.ठाणे यांचे रहाते घरी त्यांचे ताब्यातुन मानवी शरीरावर परिणाम करणारा एकुण ६,०५,७००/- रू किंमतीचा एकुण २४ किलो २०० ग्रॅम वजनाचा गुंगीकारक प्रतिबंधीत गांजा या अंमली पदार्याचा साठा हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर बाबत मुंब्रा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ९२/२०२६ एन.डी.पी.एस. अॅक्ट कलम ८ (क), २० (ब) (क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांच्या आदेशाने पोलीस उप निरीक्षक / रामकृष्ण दळवी हे करीत असुन ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थाचे रॅकेट चालवणारी मोठी टोळी असण्याची शक्यता आहे. मा. पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे सो, ठाणे शहर यांचे नेतृत्वाखाली मुंब्रा पोलीस स्टेशन एन. डी.पी.एस. पथकाने जानेवारी २०२४ ते आज पावेतो ९७१ सेवनाच्या कारवाई व ६० ताबा कारवाई करण्यात आल्या असुन त्यामध्ये ९८ आरोपीना गजाआड करण्यात आलेले आहे. तसेच ताबा कारवाई दरम्यान एकुण ४८,५६,००,०००/- रू. (आठ्ठेचाळीस कोटी, छपन्न लाख रूपये) किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आलेले आहे. मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर अंमली पदार्थ विरोधी पथकामार्फत अंमली पदार्थाची विक्री व सेवन करणाऱ्या इसमांवर यापुढे देखील अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार आहे.




# कुटुंबातील संवाद संपल्याने संस्कार कमी होत आहेत

## प्रा. डॉ. बाळासाहेब बळे : काष्टी येथील जनता विद्यालयात 'करिअर डे'चा समारोप

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

पूर्वी एकत्रित कुटुंब पद्धती अस्तित्वात असल्याने कुटुंबप्रमुखांचा आदरयुक्त धाक संपूर्ण घरावर असायचा. त्यामुळे घरात एकोप्याचे वातावरण राहून संस्कारक्षम पिढी घडत होती. मात्र, सोशल मीडियाच्या व आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात एकत्र कुटुंब पद्धती लोप पावत असून कुटुंबातील संवादही कमी झाला आहे. परिणामी मुलांवरील संस्कार कमी होत असल्याची खंत सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. बाळासाहेब बळे यांनी व्यक्त केली.

दि. २४ रोजी श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील जनता विद्यालयातील ज्युनिअर कॉलेज व कन्या विद्यालयामध्ये 'मी कोण होणार?' या विषयावर दहा दिवसांचे विद्यार्थी मार्गदर्शन शिबिर अर्थात करिअर डे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा समारोपप्रसंगी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंगल जोगदंड होत्या. तर प्रमुख उपस्थितीत जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्ता पाचपुते, कराटे प्रशिक्षक चंद्रकांत राहिंज, जनता विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य शिवप्रसाद मेहेत्रे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रा. बळे पुढे म्हणाले की, मुला-मुलींच्या शिक्षणासाठी आई-वडील शेतात अहोरात्र कष्ट करतात, कारण मुलं सुशिक्षित झाली तर जीवनातील कष्ट कमी होतील अशी अपेक्षा असते. मात्र आज शेतीत प्रचंड कष्ट करूनही अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत चालला आहे. ही परिस्थिती आजच्या तरुण पिढीला जाणवत नसल्याने 'ढाबा संस्कृती' वाढीस लागली असून समाजात विसंवादाचे विदारक चित्र दिसत आहे. पूर्वीचे राजकारणी विकासदृष्टीचे होते; मात्र सध्याच्या स्वार्थी व मतलबी राजकारणामुळे तरुण पिढी भरकटत चालली आहे. सांप्रदायिक क्षेत्रातही प्रतिष्ठा व लोभ वाढल्याने समाजसेवा दुय्यम ठरत आहे. तंत्रज्ञान झपाट्याने बदलत असताना विद्यार्थ्यांनी काळानुसार स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणले, तरच समाजपरिवर्तन शक्य आहे. अन्यथा अधोगती अटळ आहे. यासाठी पालकांनी कुटुंबात सुसंवाद राखून मुलांवर योग्य संस्कार केल्यास आदर्श विद्यार्थी घडतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी तालुका समुपदेशक हरिश्चंद्र शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर करुण मांडेसर यांनी आभार मानले.

# योजनांच्या अंमलबजावणीतून लोकशाही मूल्यांची जपणूक

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. प्रशासकीय कामकाज पारदर्शक, वेगवान व लोकाभिमुख करणे हेच संविधानातील तत्त्वांचे खरे पालन आहे. या अनुषंगाने प्रशासनाची वाटचाल वेगाने 'ई-प्रशासन' कडे सुरू असून, नागरिकांना शासकीय सेवा त्यांच्या दारी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. जनतेचा त्रास कमी करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले.

# धर्मवीर आनंद दिघे जयंती निमित्त भव्य आरोग्य शिबीर संपन्न

ठाणे : (समर्थ गांवकरी)

धर्मवीर आनंद दिघे हृदयरोग व मुत्रविकर उपचार केंद्र छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल कळवा व शिवसेना शाखा गणेश पाडा यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे व विभागप्रमुख चरणदास म्हात्रे यांच्या आयोजनाने मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.



प्रसंगी शिबिराच्या माध्यमातून हॉस्पिटल मध्ये होणाऱ्या सर्जरी ऍंजिओप्लास्टी शस्त्रक्रिया, यु.आर. एस.एल.सर्जरी, हार्ट फेलर उपचार, बायपास शस्त्रक्रिया, वाल्व शस्त्रक्रिया, गायनंक शस्त्रक्रिया, पेसमेकर शस्त्रक्रिया, अपेन्डिस शस्त्रक्रिया, पी.सी.एन.एल. सर्जरी, स्तनाची शस्त्रक्रिया, थ्रोम्बोलायझेशन उपचार, हार्निया शस्त्रक्रिया, मुतखडा शस्त्रक्रिया, टी.यु.आर.पी.सर्जटी, ई.सी.जी, ब्लड प्रेशर, वजन तपासणी, रॅण्डम ब्लडशुगर, तज्ञ डॉक्टरांचा सल्ला, उपचार व शास्त्रक्रिया करण्यात आल्या. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत, पिवळे, पांढरे व केशरी रेशनकार्ड धारकांना मोफत तपासणी, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना अंतर्गत गंभीर आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सदर शिबीर शिवसेना शाखा गणेशपाडा, दातीवली, दिवा ठाणे येथे पार पडले. प्रसंगी सदर शिबिरात दिवेकरांनी मोठ्या संख्येने भाग घेतला तर शाखाप्रमुख संतोष देसाई, शंकर पाटील व बिभीषण म्हात्रे तसेच जयदास शेलार, महेश पाटील, मुकुंद पाटील, चंदन पाटील, राजेश पाटील आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वतंत्र पोलिस स्टेशन व्हावे यासाठी पी आय खेडकर यांना निवेदन



पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर पोलिस स्टेशन 2019 साली मंजूर झाले असून अद्याप काहीच कार्यवाही झालेली नाही, मंजुरी फक्त कागदावरच आहे.

टाकळी ढोकेश्वर पोलिस चौकी अंतर्गत 45 ते 50 गावांचा समावेश असून ,मोठा परिसर आहे.

सध्या वाढती गुन्हेगारी आणि धोके लक्षात घेता स्वतंत्र पोलिस स्टेशन ची गरज आहे आणि ते लवकरात लवकर सुरू करावे असे पत्र टाकळी ढोकेश्वर जिल्हा परीषद गटाचे नेते रविंद्र राजदेव यांनी दिले. तसेच टाकळी पोलिस स्टेशन अंतर्गत एवढ्या गावांचा समावेश असून त्याठिकाणी वाहन सुद्धा नाही ,ते लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे ,रात्री अपरात्री काही घटना घडल्यास गाडी उपलब्ध होत नाही त्यामुळं अधिक धोका वाढतो,लवकरात लवकर गाडी उपलब्ध करावी ही मागणी रविंद्र राजदेव यांनी केली आहे.

# यथोचित गौरव : निघोज ग्रामपंचायतचा अभिनव उपक्रम

पारनेर : (समर्थ गांवकरी)

भारत मातेच्या रक्षणासाठी योगदान दिलेल्या सैनिकांचे व अधिकाऱ्यांचा यथोचित गौरव होण्यासाठी निघोज ग्रामपंचायतने ग्रामपंचायत कार्यालयात जवळपास ५५ सैनिक व अधिकाऱ्यांचा नामफलक ग्रेनाईट मध्ये कोनशिला तयार केली असून या कोनशिलेचे अनावरण सोमवार दि.२६ रोजी कॅप्टन विठ्ठलराव वराळ, मेजर विकास वराळ, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे, ग्रामविकास अधिकारी संजय पवार , तसेच उपस्थित सैनिक अधिकारी व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले. निघोज व परिसरातील पन्नास पेक्षा जास्त सैनिक व अधिकाऱ्यांचा या नामफलकावर समावेश असून त्यांनी १९७९ ते २०२५ पर्यंत ज्यांनी युद्ध असो वा देशअंतर्गत परस्थीतीचा सामना करण्यासाठी देशाच्या रक्षणासाठी व शांततेसाठी ज्यांनी आजपर्यंत सैन्यदलात सैनिक व अधिकारी म्हणून गौरवास्पद कामगीरी केली आहे. त्यांना या नामफलकावर महत्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. अतिशय सुंदर अक्षरात तसेच ग्रेनाईट फरशीवर ही नावे सोनेरी रंगांमध्ये ही नावे लिहीण्यात आली असून सरपंच, उपसरपंच सभागृहात जाण्यासाठी असलेल्या महत्वपूर्ण भिंतीवर ही नावे लक्षवेधी असल्याने निघोज व परिसरातील ग्रामस्थांनी या नामफलकाचे कौतुक व स्वागत केले असून ग्रामपंचायतने या सैनिक व अधिकारी यांना मानाचे स्थान देऊन जो यथोचित सन्मान दि.२६ जानेवारी २०२६ रोजी ७७ व्या प्रजासत्ताक दिनी दिल्याबद्दल सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामविकास अधिकारी संजय पवार यांचे कौतुक केले आहे.



या कार्यक्रमास यावेळी कॅप्टन विठ्ठलराव वराळ, लेफ्टीनेंट रघुनाथ लंके, वॉरंट ऑफिसर पोपटराव लंके, वॉरंट ऑफिसर मारुती रसाळ, हावलदार गोपाळराव वराळ, नायक भिवाजी वराळ, नायक विकास वराळ,नायक संभाजी ढोणे,नायक सुनिल वराळ, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक सुनिल पवार, भास्करराव वराळ, संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील,

अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, ग्रामविकास अधिकारी संजय पवार, ग्रामपंचायत माजी सदस्या सुमनताई कवाद, महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे, भाजपचे सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष विलासराव हारदे, बाबाजी वाघमारे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यावेळी म्हणाले निघोज व परिसरातील सैनिक तसेच अधिकारी यांनी देशाच्या संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी ग्रामपंचायतने कोनशिलेवर सुवर्ण अक्षरांनी नावे प्रसिद्ध करुण गावचा अभिमान जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कॅप्टन विठ्ठलराव वराळ यावेळी म्हणाले ग्रामपंचायतने सैन्य दलात कार्यरत राहणाऱ्यांचा खऱ्या अर्थाने सन्मान केला आहे. ७७ व्या प्रजासत्ताक दिनी हा बहुमान आमचा होत आहे. ग्रामपंचायत माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत.

सरपंच, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी एकोपा ठेऊन विकासकामे केली आहेत. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी कामांचा पाठपुरावा मोठ्या प्रमाणात केला म्हणून ही विकासकामे मार्गी लागली आहेत.

# 'करिअर कट्टा'चे तीन राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थीभिमुख उपक्रम, उत्तम भौतिक सुविधा, खाजगी व शासकीय क्षेत्रात विद्यार्थ्यांची नोकरीसाठी होणारी निवड, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सातत्यपूर्ण कष्ट आणि संस्थेचा खंबीर पाठिंबा यामुळे छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती दिवसेंदिवस उंचावत असल्याचे प्रतिपादन संस्थाध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी केले.




महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत सन २०२५-२६ साठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास तीन राज्यस्तरीय पुरस्कार प्रजासत्ताक दिनी दि. २६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाले आहेत.

पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातील विशेष कामगिरीबद्दल डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक म्हणून डॉ. विलास सुद्रिक, तसेच उत्कृष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी करिअर संसद म्हणून छत्रपती महाविद्यालयास हा सन्मान प्राप्त झाला असून, हा महाविद्यालयासाठी मोठा बहुमान मानला जात आहे.

स्व. शिवाजीराव नागवडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने सन १९८२ मध्ये महाविद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीला अवघ्या ९९ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेले हे महाविद्यालय आज ४२०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. १६ एकर परिसरात वसलेले सुसज्ज भौतिक सुविधा असलेले हे महाविद्यालय, राजेंद्र (दादा) नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने प्रगती करत आहे. 'नॅक' कडून प्राप्त झालेले 'ए प्लस' मानांकन व राज्यस्तरीय पुरस्कारांची हॅट्रिक हे त्याचे द्योतक आहे. संस्थाध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकासालाही महाविद्यालयात विशेष प्राधान्य दिले जाते. उच्च निकाल, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि रोजगाराभिमुख शिक्षणामुळे महाविद्यालयाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली व सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने सन २०२५ मध्ये २० विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात, तर कॅम्पस मुलाखतीद्वारे ५० विद्यार्थ्यांची विविध उद्योगक्षेत्रात निवड झाली. पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सतीश चोरमले, प्रा. वैभव सोनवणे व श्री किरण बंड यांचे मार्गदर्शन लाभत आहे. दरवर्षी कॅम्पस मुलाखतीद्वारे महाविद्यालयातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असून, करिअर संसद टीमने करिअर कट्टा अंतर्गत वर्षभरातील सर्व उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे.

या यशाबद्दल पुरस्कार प्राप्त सर्वांचे कौतुक करत संस्थाध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे, उपाध्यक्ष सौ. मेघाताई संदीप औटी, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, सर्व विश्वस्त व निरीक्षक सचिनराव लगड यांनी प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# भाईंदरमध्ये खोडियार माता जन्मजयंती उत्सव मोठ्या थाटात साजरा

**भाईंदर : (समर्थ गांवकरी)**

भाईंदर येथील श्री शक्तीधाम मंदिरात खोडियार मातेच्या जयंतीनिमित्त 15 वा खोडियार माता महोत्सव धार्मिक उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (स्टेशन ऑफिसर) यांच्या शुभहस्ते आरती करण्यात आली.



या शुभप्रसंगी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते आणि माताजींच्या दर्शनाचा लाभ घेतला.

महोत्सवाप्रसंगी समाजसेवक श्री.नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणवल, कनुभाई तन्ना, जयभाई चंदराणा, शांताराम पाटील, धनेश पाटील, मोहन मधुकर पाटील, शक्ती मोहन पाटील तसेच व्याख्याते श्री.प्रविण महाराज पंड्या उपस्थित होते. याशिवाय हेमंत पाटील, जयप्रकाश पाटील, शरद पाटील, प्रीती पाटील, गिरीशभाई महाराज आणि इतर अनेक भक्त उपस्थित होते. पाहुण्यांनी त्यांच्या आशीर्वादांनी आणि प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रमाला वैभवशाली बनवले.

समाजसेवक डॉ. नानजीभाई ठक्कर म्हणाले की, माँ खोडियार यांनी नेहमीच धर्माचे अधर्मापासून रक्षण केले आहे. प्रामाणिक मनाने त्यांची पूजा करणाऱ्या कोणालाही ती कधीही निराश करत नाही. आई आपल्याला सत्याच्या मार्गावर स्थिरपणे चालायला, अन्यायाच्या वेळी निर्भयपणे उभे राहण्यास आणि जीवनात संयम आणि नैतिकता राखण्यास शिकवते. संपूर्ण कार्यक्रम भक्ती, संस्कृती आणि एकतेच्या भावनेने यशस्वीरित्या संपला.

### मोठ्या पडद्यावर उलगडणार नारीसामर्थ्याची गाथा! श्रेयस तळपदे प्रस्तुत, ॲफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि ओ डी आय ग्रुप निर्मित

# 'मर्दिनी' ३ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित !

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

प्रत्येक स्त्रीतील मर्दिनीला जागं करणारा बहुप्रतीक्षित मराठी चित्रपट 'मर्दिनी' आता प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. नारीशक्तीचा प्रभावी आणि प्रेरणादायी आविष्कार असलेला हा सिनेमा ३ जुलै २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. सिनेमाच्या या नव्या पोस्टर मध्ये एक ठाम पाऊल, उग्र रूप आणि ज्वालांनी वेढलेलं नाव 'मर्दिनी' पाहायला मिळतं.




सामान्य चौकटी मोडत, स्त्रीच्या संयम, संघर्ष आणि आत्मबळाचा ठसा उमटवणारा 'मर्दिनी' भावनांना स्पर्श करणारा आणि मनाला प्रश्न विचारायला लावणारा अनुभव देईल असा दिसतोय.

प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले यांसारख्या प्रमुख कलाकारांच्या सशक्त अभिनयासोबत बालकलाकार मायरा वैकुळ हिची भूमिका कथेला एक वेगळी भावनिक उंची देते.

अजय मयेकर यांचा दिग्दर्शक म्हणून हा पहिलाच चित्रपट असून, दिप्ती तळपदे यांच्या निर्मितीखाली 'मर्दिनी' साकारला जात आहे. तर सह निर्माती टिना राकेश कोठारी, छायांकन शब्बीर नाईक, संकलन अभिषेक शेठ, संगीत हितेश मोडक, पटकथा आणि संवाद महाबळेश्वर नार्वेकर यांनी केले आहे. ताकदीला आवाज आणि धैर्याला दिशा देणारा 'मर्दिनी' ३ जुलै २०२६ पासून प्रदर्शित.

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**श्रीरामपूर: (समर्थ गांवकरी)**

बहुजन शिक्षण संघ संचालित शंभुक विद्यार्थी वसतिगृहात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक संघाचे अध्यक्ष कॉ. बाळासाहेब सुरुडे व परिवर्तन फाऊंडेशनचे खजिनदार भीमराव खंडीझोड यांच्या शुभहस्ते प्रथम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कॉ. बाळासाहेब सुरुडे यांच्या शुभहस्ते वस्तीगृहाचे ध्वजारोहण करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब आल्हाट राधिकाताई क्षीरसागर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले तसेच नगरपालिका शिक्षण मंडळाचे माजी सदस्य सुरेश दुग्गड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना दूध व बिस्किटाचे वाटप करण्यात आले.

# थरार आणि सस्पेन्सचा नवा अध्याय! संजय मिश्रा–नीना गुप्ता स्टारर 'वध २'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

लव फिल्म्सची आगामी थ्रिलर-मिस्ट्री चित्रपट 'वध 2'चा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचं लेखन व दिग्दर्शन जसपाल सिंग संधू यांनी केलं आहे. ट्रेलरमध्ये थरार, भावनिक संघर्ष आणि एक नवी कथा पाहायला मिळते, मात्र कथेतली मुख्य घटना अजूनही सस्पेन्समध्ये ठेवण्यात आली आहे.




ट्रेलरमध्ये कलाकारांची गंभीर आणि वास्तवदर्शी अभिनयशैली स्पष्टपणे दिसून येते, ज्यामुळे चित्रपटाची भावनिक खोली अधिक ठळक होते. संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांच्यासोबतच, लव रंजन आणि अंकुर गर्ग यांच्या लव फिल्म्स बॅनरखाली तयार झालेल्या 'वध 2'मध्ये कुमुद मिश्रा, शिल्पा शुक्ला तसेच नवे कलाकार अमित के सिंग, अक्षय डोगरा आणि योगिता बिहानी ही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

चित्रपटाबद्दल बोलताना लेखक-दिग्दर्शक जसपाल सिंग संधू म्हणाले, "'वध 2' असा घडवण्यात आला आहे की, तो मजबूत कथा आणि स्पष्ट व्यक्तिरेखांसह प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देईल. आम्ही स्टोरीटेलिंगला आणखी एक पायरी पुढे नेलं आहे, जेणेकरून प्रेक्षकांना एक लेयर्ड थ्रिलर-मिस्ट्री अनुभवता येईल. ट्रेलरमध्ये 'वध 2'च्या त्या नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या जगाची झलक आहे, जिथे सत्य नेहमीच स्पष्टपणे दिसून येत नाही." प्रोड्यूसर लव रंजन यांनी सांगितले, "'वध 2' ही पहिल्या चित्रपटाच्या विचारधारा आणि भावनिक खोलीला पुढे नेणारी आहे, मात्र पूर्णपणे नव्या कथेसह. या फ्रँचायझीचं नेतृत्व संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांसारखे अनुभवी कलाकार करत आहेत आणि त्यांच्यासोबत कुमुद मिश्राही आहेत, ही या चित्रपटाची खास बाब आहे. या तिघांची प्रभावी स्क्रीन प्रेझेन्स हे सिद्ध करते की मजबूत कथा वयाच्या किंवा ठराविक चौकटींच्या पलीकडे असतात."

प्रोड्यूसर अंकुर गर्ग पुढे म्हणाले, "IFFIमध्ये 'वध 2'ला मिळालेला प्रतिसाद आणि 'वध' चित्रपटाशी प्रेक्षकांचा असलेला भावनिक संबंध, या सिनेमाच्या जगाशी त्यांचं घट्ट नातं दाखवतो. यामुळे आमचा हा विश्वास अधिक दृढ होतो की प्रेक्षक आजही अर्थपूर्ण, व्यक्तिरेखांवर आधारित कथा पाहू इच्छितात. 'वध 2'मध्ये तेच पुढे नेण्यात आलं आहे, जे प्रेक्षकांना पहिल्या भागात आवडलं होतं.

# शेठ टी.जे.हायस्कूल आणि शेठ एन के.टी.कॉलेजचा प्रजासत्ताक दिन समारंभ

**(समर्थ गांवकरी)**

दिनांक 26 जानेवारी 2026 दिवस ही शेठ टी.जे एज्युकेशन सोसायटी संचालित सर्व शाळा आणि कॉलेजच्या कार्यक्रम उत्साहाने साजरा करण्यात आला संस्था प्रमुख श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते शाळेच्या पटांगणावर तिरंगा फडकवण्यात आला .त्यानंतर ध्वजवंदन करून सर्वांनी राष्ट्रगीत म्हटले ध्वजगीत प्रस्तुत करून परेड द्वारा मान्यवरांना सलामी देण्यात आली. सचिव श्री नटवरलाल वीरजीभाई ठक्कर व इतर विश्वस्त ही उपस्थित होते .सर्व शाळा कॉलेजचे प्राचार्य ,सुपरवायझर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते .संस्था प्रमुख श्री नानजीभाई यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त एकत्र आलो आहोत, हा दिवस आपल्या प्रत्येकासाठी अभिमानाचा आहे. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशाने संविधान स्वीकारले आणि भारत एक लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहिला.




संविधान आपल्याला स्वातंत्र्य, समानता आणि न्याय देते; पण त्याचबरोबर कर्तव्यांची जाणीव करून देते. देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे. आज तुम्ही विद्यार्थी आहात, पण उद्या तुम्ही डॉक्टर, अभियंता, शिक्षक, शास्त्रज्ञ, अधिकारी आणि देशाचे जबाबदार नागरिक होणार आहात.

विद्यार्थीदशेतच जर शिस्त, प्रामाणिकपणा, मेहनत आणि राष्ट्रप्रेम ही मूल्ये आत्मसात केली, तर तुम्ही नक्कीच देशाला योग्य दिशा देऊ शकाल. शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्यासाठी नाही, तर चांगला माणूस बनण्यासाठी आहे, हे नेहमी लक्षात ठेवा.

आजच्या या पवित्र दिवशी मी तुम्हा सर्वांना सांगू इच्छितो की—

- आपल्या पालकांचा व शिक्षकांचा आदर करा
- वेळेचे महत्त्व ओळखा
- मोबाईलपेक्षा पुस्तकांशी मैत्री करा
- आणि नेहमी सत्याच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करा

चला तर मग, या प्रजासत्ताक दिनी आपण सर्वजण संकल्प करूया की—

आपण शिक्षणाच्या जोरावर स्वतःचा विकास करू आणि त्याचबरोबर भारत देशाला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी योगदान देऊ.

तुमच्यावरच भारताचे उज्ज्वल भविष्य अवलंबून आहे.

# श्रीनिवा श्रीनिवा श्रीनिवा

**------ : (समर्थ गांवकरी)**

शेठ टी.जे.हायस्कूल आणि शेठ एन के.टी.कॉलेजचा प्रजासत्ताक दिन समारंभयांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त एकत्र आलो आहोत, हा दिवस आपल्या प्रत्येकासाठी अभिमानाचा आहे. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशाने संविधान स्वीकारले आणि भारत एक लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहिला.

संविधान आपल्याला स्वातंत्र्य, समानता आणि न्याय देते; पण त्याचबरोबर कर्तव्यांची जाणीव करून देते. देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे. आज तुम्ही विद्यार्थी आहात, पण उद्या तुम्ही डॉक्टर, अभियंता, शिक्षक, शास्त्रज्ञ, अधिकारी आणि देशाचे जबाबदार नागरिक होणार आहात.

विद्यार्थीदशेतच जर शिस्त, प्रामाणिकपणा, मेहनत आणि राष्ट्रप्रेम ही मूल्ये आत्मसात केली,




अंबिका विद्या मंदिर शाळेच्या प्रजासत्ताक दिन सोहळा
दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी अंबिका विद्यामंदिर शाळेच्या ध्वजारोहण प्रसंगी शिक्षण महर्षी श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ,श्री राजेंद्र पुराणी,श्रीमती मीनाबेन जाधव, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यापीठ तसेच आमंत्रित पालघर उपस्थित होते.

# रावसाहेब घोडके यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

प्रा. राम सोनवणे मित्र मंडळ, श्रीगोंदा तालुका यांच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय समाजभूषण पुरस्कार श्रीगोंदा येथील ज्येष्ठ समाजप्रबोधनकार रावसाहेब घोडके यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण लवकरच मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. रावसाहेब घोडके हे गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार करत असून, थोर समाजसुधारक व महापुरुषांचे विचार समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत. विशेष म्हणजे, हे कार्य ते चक्क सायकलवरून प्रवास करत पार पाडत आहेत. महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमांमध्ये त्यांची आवर्जून उपस्थिती असते. समाजातील जात, धर्म,




पंथभेद दूर व्हावेत, मानवता हीच खरी ओळख आहे, हा संदेश ते आपल्या कृतीतून समाजाला देत आहेत. वाढत्या वयातही एखाद्या तरुणालाही लाजवेल असा सातत्यपूर्ण सायकल प्रवास करत समाजप्रबोधनाचे कार्य घोडके करत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ, सातत्यपूर्ण आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेऊनच प्रा. राम सोनवणे मित्र मंडळाच्या वतीने त्यांना हा जिल्हास्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# साईबालाजी एज्युकेशन सोसायटीतर्फे कॉर्पोरेट फुटबॉल लीग आणि स्टुडंट फुटबॉल लीगचे यशस्वी आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

साईबालाजी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी कॉर्पोरेट फुटबॉल लीग आणि स्टुडंट फुटबॉल लीग या दोन महत्त्वपूर्ण फुटबॉल स्पर्धांचे अत्यंत यशस्वी आयोजन २३ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसह कॉर्पोरेट क्षेत्रातील सहभागी खेळाडूंमध्ये क्रीडावृत्ती, संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुणांचा विकास घडवून आणणे हा या स्पर्धांचा मुख्य उद्देश होता.तसेच या स्पर्धा मागील १० वर्षापासून यशस्वीरित्या आयोजित केल्या जात आहेत.




कॉर्पोरेट फुटबॉल लीग मध्ये विविध १६ नामांकित कॉर्पोरेट संस्थांतील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेमुळे व्यावसायिक जीवनातील ताणतणावातून मुक्तता मिळण्यासोबतच आरोग्यदायी व सक्रिय जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. त्याचप्रमाणे, स्टुडंट फुटबॉल लीग मध्ये ५०० हुन अधिक विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपली क्रीडा कौशल्ये, चिकाटी आणि संघभावना प्रभावीपणे सादर केली.

स्पर्धेच्या संपूर्ण कालावधीत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. चुरशीचे सामने, शिस्तबद्ध खेळ आणि खेळाडूवृत्ती यामुळे संपूर्ण स्पर्धेला विशेष रंगत प्राप्त झाली.

बक्षीस वितरण समारंभप्रसंगी साईबालाजी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनीष आर. मुंदडा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, " या स्पर्धा ह्या केवळ विजय किंवा पराजयापुरता मर्यादित नसून या माध्यमातून शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. यासारखे उपक्रम युवकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि सर्वांगीण विकास घडवून आणतात." बक्षीस वितरण समारंभास प्रा.निरुपमा मुंदडा सचिव साईबालाजी एज्युकेशन सोसायटी या देखील उपस्थित होत्या.

साईबालाजी कॉर्पोरेट फुटबॉल लीग (सीएफएल) सीझन १० 'फुटझेलो २०२६' या स्पर्धेत आयडियाज संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ॲक्सेन्चर संघाने उपविजेतेपद मिळवले, तर विप्रो संघाने तृतीय क्रमांक (द्वितीय उपविजेतेपद) प्राप्त केले.

साईबालाजी फुटबॉल लीग (अंडर–२१) चॅम्पियनशिप सीझन ४ या स्पर्धेत गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत इंदिरा विद्यापीठ संघाने उपविजेतेपद मिळवले.

या उपक्रमांमुळे क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असून युवकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता, सकारात्मक ऊर्जा आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. साईबालाजी एज्युकेशन सोसायटीच्या या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून विशेष कौतुक करण्यात येत आहे.